दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३२५ I मंगळवार ८ सप्टेंबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## ४ हजारांची लाच भोवली; भूमी अभिलेख उपअधीक्षकाला ३ वर्षांचा कारावास

**नाशिक :** शेतगटाच्या एकत्रीकरण योजनेतील नकाशातील चुकीची नोंद दुरुस्त करून प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याच्या मोबदल्यात चार हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आलेल्या देवळा भूमी अभिलेख कार्यालयातील उपअधीक्षक सुरेश वेताळ याला जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषी ठरविले. न्यायालयाने त्याला तीन वर्षे कारावास व दंडाची शिक्षा सुनावली. मौजे चिंचवे येथील शेतगटाच्या नकाशातील चुकीची नोंद दुरुस्त करण्यासाठी वेताळ याने तक्रारदाराकडे चार हजार रुपयांची मागणी केली होती. कार्यालयातील दालनात लाचेची रक्कम स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्याला पकडले होते. याप्रकरणी ३० मार्च २०१२ रोजी देवळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासानंतर १४ मार्च २०१४ रोजी दोषारोपपत्र दाखल झाले. न्यायालयाने कलम ७ अन्वये दोन वर्षे कारावास व दोन हजार रुपये दंड, तर कलम १३(२) अन्वये तीन वर्षे कारावास व तीन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सरकारी पक्षातर्फे अभियोक्ता विजय गायकवाड व शिरीष कडवे यांनी काम पाहिले.

# ...तर १० मिनिटांत महाराष्ट्र बंद करू!

## जरांगेंचा सरकारला थेट इशारा; १२ सप्टेंबरला अंतरवालीत जमण्याचे मराठा समाजाला आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाचा आज दहावा दिवस असून, सरकारकडून जाणीवपूर्वक हयगय आणि हलगर्जीपणा सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. सरकारला १२ सप्टेंबरपर्यंतची मुदत दिली असून, त्या दिवशी राज्यभरातील मराठा समाजाने मोठ्या संख्येने अंतरवाली सराटीत दाखल व्हावे, असे आवाहन जरांगे यांनी केले.

मुंबईत आंदोलनादरम्यान एका जरी मराठा तरुणाचे रक्त सांडले, तर १० मिनिटांत महाराष्ट्र बंद झाला पाहिजे, असा थेट इशाराही त्यांनी सरकारला दिला.

जरांगे म्हणाले, मराठ्यांचा रोष वाढत आहे. सरकार जाणूनबुजून हलगर्जीपणा करत आहे. मराठा समाज संपवण्यासाठीच हा प्रकार सुरू आहे. अनेक मंत्र्यांनी उपोषणाची वेळ येऊ देणार नसल्याचे सांगितले होते. प्रसाद लाड यांनीही आम्हाला बोलवा, फडणवीस मराठ्यांच्या मागण्या पूर्ण करतील, असे सांगितले होते. मात्र वर्षभरात काहीही झाले नाही.

दरम्यान, सरकारमधील काही नेत्यांकडून आंदोलन मोडीत काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. मुंबईकडे निघाल्यानंतर आंदोलकांवर हल्ला करून सरकारला बदनाम करण्याचा डाव असल्याचा दावा करत, आंदोलकांनी सावध राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

१२ सप्टेंबरला अंतरवाली सराटीत सर्व मराठ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन करताना त्यांनी सांगली, सोलापूर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सिंधुदुर्ग, रायगड, मुंबई, अहिल्यानगर आणि नाशिकसह विविध जिल्ह्यांतील प्रत्येक गावातून मराठा बांधवांनी यावे, असे म्हटले. दहा लोक आले तरी मुंबईकडे जाणार, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.मुंबईतील संभाव्य आंदोलनाबाबत बोलताना जरांगे यांनी पोलिसांकडून हल्ला झाल्यास चेंगराचेंगरी होऊ नये म्हणून आंदोलकांनी सावध राहावे, असे सांगितले. स्वसंरक्षणासाठी तयार राहण्याचे आवाहन करत त्यांनी सरकारविरोधात तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला.



### ठाकरेंकडून प्रचार करून घेतला..

**देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीत राज ठाकरे यांचा प्रचारासाठी वापर केला आणि त्यानंतर त्यांच्या मुलाला निवडणुकीत पाडले. तसेच भाजपच्या काही व्यक्तींना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून उमेदवारी देण्यात आल्याने शिंदे यांच्याकडे सध्या केवळ १० ते १२ आमदारच आहेत.**

**– मनोज जरांगे**

## राखीचा धागा अजून ओला असतानाच...

# कांद्यासाठी सख्ख्या बहिणींवर भावाचा 'राक्षसी' हल्ला!

## कर्जत तालुक्यात माणुसकीला काळिमा; ११२ वर फोन करून बहिणींनी मागवली पोलिसांची मदत; जखमी महिलांवर रुग्णालयात उपचार





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** रक्षाबंधन नुकतेच उत्साहात साजरे झाले... बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधली, भावाने तिच्या सुखासाठी आयुष्यभर साथ देण्याचे आश्वासन दिले. कुठलीही बहीण भावाने सुखी राहावे म्हणून देवाकडे प्रार्थना करते, तर भाऊही बहिणीच्या चेहऱ्यावरचे हास्य कायम राहावे यासाठी धडपडतो. मात्र, याच पवित्र भाऊ-बहिणीच्या नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना कर्जत तालुक्यातील राक्षसवाडी खुर्द येथे समोर आली आहे.

शेतातून केवळ खाण्यासाठी थोडासा कांदा आणल्याच्या कारणावरून सख्ख्या भावाने बहिणीवर कुऱ्हाडीच्या दांड्याने आणि लाठ्या-काठ्यांनी हल्ला केल्याचा आरोप आहे. त्यानंतर बहिणीची विचारपूस करण्यासाठी आलेल्या इतर दोन बहिणींनाही भावासह त्याच्या नातेवाईकांनी मारहाण केल्याची तक्रार आहे. या हल्ल्यात महिला जखमी झाल्या असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.राक्षसवाडी खुर्द येथे घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. आरोपींकडून जीवघेणी मारहाण होत असल्याने भयभीत झालेल्या महिलांनी तातडीने ११२ क्रमांकावर फोन करून पोलिसांची मदत मागितली. पोलिसांचे वाहन घटनास्थळी पोहोचल्याने महिलांची सुटका झाल्याचे सांगण्यात येत आहे.मात्र, या घटनेनंतर पोलिसांच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. पीडित महिलांच्या म्हणण्यानुसार, हल्ला करणाऱ्यांविरुद्ध तातडीने कठोर कारवाई होणे अपेक्षित असताना, त्यानंतर उलट तक्रारीचा प्रकार घडला.या प्रकरणातील मुख्य आरोपीने पोलीस ठाण्यात जाऊन महिलांनीच आपल्याला मारहाण करून गळ्यातील दागिने चोरल्याची उलट तक्रार दिल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर पीडित महिलांविरुद्धही गुन्हा दाखल झाल्याचा आरोप आहे.एका बाजूला जखमी महिला रुग्णालयात उपचार घेत असताना दुसऱ्या बाजूला त्यांच्यावरच गुन्हा दाखल होण्याच्या प्रकारामुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे. पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या तक्रारी, वैद्यकीय अहवाल आणि घटनास्थळावरील वस्तुस्थिती यांची निष्पक्ष चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी मागणी होत आहे. पतीच्या निधनानंतर अलका चोरमले या गेल्या काही वर्षांपासून **(पान ४ वर)**

### कर्जतच्या कायदा-सुव्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह

ही घटना कर्जत तालुक्यात घडल्याने कायदा-सुव्यवस्थेचा मुद्दाही ऐरणीवर आला आहे. महिलांना ११२ वर फोन करून पोलिसांची मदत घ्यावी लागणे, त्यानंतर दोन्ही बाजूंकडून तक्रारी दाखल होणे आणि जखमी महिलांवरच गुन्हा दाखल झाल्याचा आरोप होणे, या संपूर्ण प्रकाराची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दखल घेण्याची मागणी होत आहे.

### महत्त्वाचे..

#### 'धर्मवीर गड' आता राज्य संरक्षित स्मारक

**श्रीगोंदा :** छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रम आणि बलिदानाची साक्ष देणाऱ्या श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथील ऐतिहासिक 'धर्मवीर गड'ला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाने ७ सप्टेंबर रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला. भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी गडाच्या जतन व संवर्धनासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीनुसार यापूर्वी पेडगावच्या ऐतिहासिक बहादूरगडाचे नामकरण 'धर्मवीर गड' करण्यात आले होते.इतिहासानुसार, संगमेश्वर येथे पकडल्यानंतर छत्रपती संभाजी महाराज आणि कवी कलश यांना याच गडावर आणण्यात आले होते. यादवकालीन स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना असलेली रामेश्वर, भैरवनाथ, मल्लिकार्जुन, लक्ष्मीनारायण, बाळेश्वर आणि पाताळेश्वर ही प्राचीन मंदिरेही येथे आहेत.

# ५८ लाख नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध होणार : ना. राधाकृष्ण विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख नोंदींच्या याद्या प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार असून, कुणबी दाखले मिळण्यातील अडचणी दुर करण्यासाठी दिनांक १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात शिबिरे आयोजित करावीत; तसेच सर्व जिल्ह्यांमधील अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय ठेवून आरक्षणातील प्रत्येक प्रश्नाबाबत गांभीर्याने कार्यवाही करावी, अशा सूचना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागीय आयुक्तांसह सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.

मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठवाड्यातील धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, लातूर, जालना या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी यांच्याशी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेऊन झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. या बैठकीमध्ये मंत्री विखे पाटील यांनी जिल्हानिहाय देण्यात आलेली जात



पडताळणी प्रमाणपत्रांची संख्या, कुणबी नोंदी तसेच प्राप्त झालेल्या अर्जांचा सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीची तसेच अंमलबजावणीची सविस्तर माहिती बैठकीमध्ये सादर केली. यामध्ये प्रामुख्याने परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाने सापडलेल्या नोंदी वेबसाईटच्या माध्यमातून जाहीर केल्या आहेत. त्याच पद्धतीने इतर जिल्ह्यांनीही अशाच प्रकारची कार्यवाही करावी आणि १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रमाणपत्रांच्या पूर्ततेसाठी शिबिरे आयोजित करून अधिक चांगल्या पद्धतीचे नियोजन करावे, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीमध्ये दिल्या.बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मंत्री विखे पाटील यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. वंशावळ आणि कायदेशीर नियमांचे पालन करूनच प्रमाणपत्रे दिली जातील. मराठवाड्यात आतापर्यंत साडेतीन लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाल्याचे सांगत, पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे देताना नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील समाजासाठी आंदोलन करीत असून, त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत सरकार त्यांच्याशी चर्चा करणारच आहे. काही लोकांना त्या पायघड्या वाटत असतील, पण हे सर्व आरोप बिनबुडाचे आहेत. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकार पुढाकार घेत आहे; परंतु काही लोक मराठा आरक्षणाला विरोध करण्यासाठी मुद्दाम आंदोलनाची भाषा करीत असतील तर ते चुकीचे असून, याद्वारे विनाकारण सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. सरकारने काहीही चुकीचे केलेले नाही व तशी भूमिकाही नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न कायदेशीर चौकटीत आणि सर्व समाजांच्या हिताचा विचार करून सोडविण्याची सरकारची भूमिका असून, पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्याचे विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

मराठा आरक्षणाबाबत सरकार केवळ आश्वासने देत असल्याच्या मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपावर बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, मागील आंदोलनातील बहुतांश मागण्यांवर सरकारने कार्यवाही केली असून, उर्वरित मागण्यांवरही मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची भूमिका असून, आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करण्याची सरकारची कधीही तयारी आहे.

## वीर गोगादेव मिरवणुकीत पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** वीर गोगादेव जन्मोत्सवानिमित्त रविवारी सायंकाळी शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. ही मिरवणूक चितळे रोडवरील नेता सुभाष चौकात आली असता पोलीस बंदोबस्तावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांशी वाद्य पथकातील तरुणांची वादावादी होऊन चौघा जणांनी पोलीस कर्मचाऱ्याला शिवीगाळ दमदाटी करून धक्काबुक्की केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चौघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वाद्य पथकातील चौघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, वीर गोगादेव जन्मोत्सवानिमित्त रविवारी सायंकाळी नगर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. ही मिरवणूक सायंकाळी चितळे रोडवरील नेता सुभाष चौकात आली असता अचानक वीज पुरवठा बंद झाला. याच दरम्यान पोलीस बंदोबस्तात असलेले पोलीस कॉन्स्टेबल अनुप शेखर झाडबुके (वय ३०, रा. सावेडी) व त्यांचे सहकारी मिरवणूक मार्गावर झालेली वाहतूक कोंडी सुरळीत करत होते. याच दरम्यान पो. कॉ. झाडबके यांनी हिंदवी शौर्य वाद्य पथकातील सदस्यांना मिरवणूक पुढे नेण्यास सांगितले. याचा राग येऊन वाद्य पथकातील सुनील करांदे व त्याच्या तीन साथीदारांनी पो. कॉ. झाडबके यांच्याशी वाद घालत त्यांना शिवीगाळ केली. तू कुठला पोलीस, तुझ्याकडे पाहतोच अशी धमकी देत चौघा जणांनी पो. कॉ. झाडबके यांच्या अंगावर धावून जाऊन धक्काबुक्की करत मारहाण केली. या घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. यावेळी पोलीस बंदोबस्त साठी तैनात असलेले कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी तात्काळ घटनेचे गांभीर्य ओळखून परिस्थिती नियंत्रणात आणली. यावेळी पोलिसांनी जमावाला पांगविण्यासाठी सौम्य लाठीचार्ज केला. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे **(पान ४ वर)**

# अशोक कारखाना कर्जाच्या विळख्यात!

## कर्जाचा आकडा ३८४ कोटींवर; वर्षापासून कामगारांची देणीही थकली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील अशोक सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक कारभाराचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला असून, अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेसह राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) कडून घेतलेल्या कर्जापोटी ३८४ कोटींचे व्याज थकीत असल्याचा धक्कादायक उल्लेख शेतकरी संघटनेने प्रादेशिक सहसंचालकांना दिलेल्या निवेदनात केला आहे. एवढी मोठी आर्थिक थकबाकी असतानाही कारखान्याचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्याबाबत प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे व तालुकाध्यक्ष युवराज जगताप यांनी प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहिल्यानगर यांच्याकडे याबाबत निवेदन सादर केले आहे. या निवेदनावर चौकशी करून आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे कागदपत्रातून दिसून येते.

### 'प्रशासकीय मंडळ नेमा, अन्यथा जबाबदारी निश्चित करा!'

कारखान्याच्या आर्थिक परिस्थितीची तातडीने चौकशी करून संचालक मंडळ बरखास्त करावे आणि शासनाच्या नियमांनुसार प्रशासकीय मंडळाची नियुक्ती करावी, अशी ठाम मागणी शेतकरी संघटनेने केली आहे. अशोक कारखान्याच्या आर्थिक कारभारातील हा गंभीर विषय आता शासकीय पातळीवर पोहोचला असून, चौकशी अहवालात काय निष्पन्न होते आणि संचालक मंडळावर जबाबदारी निश्चित करण्यात येते का? याकडे श्रीरामपूर तालुक्यातील ऊस उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

### अशोक कारखान्याकडे असलेले कर्ज आणि इतर देणे

**कामगारांचे देणे :** १३ कोटी रुपये
(अंदाजे एक वर्षाचा पगार व निवृत्त कर्मचाऱ्यांचे देणे)
**जिल्हा सहकारी बँक कर्ज :** २८० कोटी रुपये
**एनसीडीसीचे कर्ज :** १०४ कोटी रुपये
(३१ मार्च अखेर थकबाकी ३ कोटी ४७ लाख)

निवेदनानुसार, अशोक सहकारी साखर कारखान्याने एनसीडीसीकडून घेतलेल्या कर्जाची मोठी रक्कम थकीत आहे. शासन निर्णयांनुसार कर्जाची थकबाकी निर्माण झाल्यास संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्याची तरतूद असल्याचा दावा शेतकरी संघटनेने केला आहे.

मात्र, संबंधित कारवाई अद्याप झालेली नसल्याने संघटनेने प्रशासनाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विशेष म्हणजे, संघटनेच्या निवेदनात कारखान्यावर असलेल्या आर्थिक भाराचा उल्लेख करताना एनसीडीसी कर्ज, कामगारांची थकीत देणी आणि इतर आर्थिक जबाबदाऱ्या मिळून कारखान्याची आर्थिक स्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. कारखान्याच्या उपलब्ध मालमत्तेच्या तुलनेत कर्जाचा बोजा मोठा असल्याचा दावाही करण्यात आला आहे.

**ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा पैसा धोक्यात?**

कारखान्याच्या आर्थिक परिस्थितीचा थेट परिणाम ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. मागील काही वर्षांत कारखान्याच्या कामगारांचे वेतन थकीत असल्याचे तसेच ऊस उत्पादकांच्या बिलांबाबतही गंभीर परिस्थिती आहे. उत्पादन व गाळपाच्या आकडेवारीतही घट झाली. अशा स्थितीत पूर्व हंगामी अर्थ सहाय्याचे पैसे देखील कर्ज भरण्यात जातात. त्यामुळे कारखाना आर्थिक संकटात असताना केवळ कागदी कारभार सुरू ठेवून प्रश्न सुटणार आहे का? असा सवाल अनिल औताडे यांनी केला आहे.

# पोलिसांची तत्परता विश्वविक्रमात नोंदवावी!

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

कायद्याची गती सर्वांसाठी समान आहे का? असा प्रश्न वेळोवेळी उपस्थित होतो. पुण्यातील संतोष पंडित यांच्या अटकेच्या घटनेने हा मूलभूत प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला.

एखाद्या सोशल मीडिया व्हिडिओतील कथित आक्षेपार्ह मजकुरावर तक्रार दाखल होते, पोलीस यंत्रणा सक्रिय होते आणि मध्यरात्री आरोपीच्या घरापर्यंत पोहोचून कारवाई होते. मंत्री चंद्रकांत पाटील आणि मिताली साळवेकर यांच्याबाबत कथित आक्षेपार्ह व बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याच्या तक्रारीवरून संतोष पंडित यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आणि पहाटेच्या सुमारास त्यांना अटक करण्यात आली.

पोलीस इतक्या तत्परतेने काम करतात, हे पाहून सामान्य नागरिकाने आनंदी व्हायला हवे. पण त्याच क्षणी त्याच्या मनात दुसरा प्रश्न उभा राहतो की, हीच तत्परता माझ्या तक्रारीच्या वेळी कुठे असते?

गावातील एखाद्या सामान्य नागरिकावर हल्ला होतो. तो पोलीस ठाण्यात जातो. अर्ज घेतला जातो; चौकशीच्या नावाखाली वेळ जातो; 'वरिष्ठांना विचारतो', 'उद्या या', 'समोरच्या व्यक्तीला बोलावतो' अशा कारणांनी दिवस निघून जातात. अनेकदा फिर्याद दाखल करण्यासाठी नागरिकाला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे, लोकप्रतिनिधींकडे किंवा न्यायालयाकडे धाव घ्यावी लागते.

ही केवळ जनमानसातील भावना नाही. ऑगस्ट २०२५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने पुण्यातील खडक पोलीस ठाण्यात तक्रारदाराची एफआयआर नोंदवण्यास नकार दिल्याच्या प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली होती आणि ४८ तासांत एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले होते. न्यायालयाने त्या ... पोलिसांच्या वर्तनाबाबत क... शब्दांत टिप्पणी केली होती.

२०२६ मध्येही अशीच परिस्थिती अधोरेखित करणारे प्रकार समोर आले आहेत. मिरा रोड येथील ... क्रेन दुर्घटनेत तरुणाचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या वडिलांनी बांधकाम व्यावसायिका... एफआयआर नोंदवण्यासाठी पोलिसांनी वारंवार विनंती करूनही दखल घेतली नसल्याचा आरोप केला.

नागपूरचे उदाहरणही बोलके आहे. जानेवारी २०२५ मध्ये शहरातील विविध पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेकडे सुमारे ६ हजार प्रलंबित तक्रारी असल्याचे वृत्त आले. त्या तक्रारी निकाली काढण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागले.

म्हणजे प्रश्न पोलिसांकडे मनुष्यबळ नाही, कामाचा ताण आहे, अशी कारणे देण्यापुरता राहिलेला नाही. कारण ज्या वेळी एखाद्या प्रभावशाली व्यक्तीशी संबंधित प्रकरण समोर येते, त्याच वेळी यंत्रणेची गती अचानक वाढल्याचे चित्र जनतेसमोर निर्माण होते. मग सामान्य माणसाच्या मनात संशय निर्माण होणार नाही तर काय?

पोलिसांचे काम कोणाच्या दबावाखाली, कोणाच्या प्रतिष्ठेने किंवा कोणाच्या राजकीय वजनाने बदलता ... नये. कायद्याची नजर समान ...ते, असे आपण म्हणतो; ...ग कायद्याची गतीही समान असली पाहिजे.

संतोष पंडित दोषी आहेत की निर्दोष, हे न्यायालय ठरवेल. कथित ...डिओत काय म्हटले आहे, ... कोणता गुन्हा सिद्ध होतो, तक्रारीचे स्वरूप काय आहे, अटक आवश्यक होती का? या सर्व प्रश्नांची उत्तरे तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेत मिळतील. त्यामुळे या प्रकरणात आरोपीला दोषी ठरविण्याची घाईही नको आणि पोलिसांच्या कारवाईला राजकीय रंग देण्याची घाईही नको.

पण पोलिसांनी इतक्या वेगाने काम केले, याचे स्वागत करतानाच हीच गती प्रत्येक सामान्य नागरिकाला मिळणार का, हा प्रश्न विचारण्याचा अधिकार समाजाला नक्कीच आहे. महाराष्ट्रात हजारो तक्रारी, अर्ज, तपास आणि प्रलंबित प्रकरणे आहेत. बीडमध्येही पोलिसांनी प्रलंबित तक्रारींचा मोठा ढिगारा कमी करण्यासाठी विशेष यंत्रणा राबविल्याचे वृत्त आहे; याचा अर्थ समस्या अस्तित्वात आहे आणि ती दूर करण्यासाठी स्वतंत्र प्रयत्न करावे लागतात. म्हणून संतोष पंडित प्रकरणाची खरी कसोटी ही केवळ अटक किती वाजता झाली, एफआयआर किती मिनिटांत नोंदली किंवा पोलीस किती वेगाने घरी पोहोचले यात नाही. कसोटी अशी आहे की उद्या एखाद्या सफाई कामगाराचा, शेतकऱ्याचा, मजुराचा, महिलांचा किंवा सामान्य कुटुंबाचा गंभीर प्रश्न पोलीस ठाण्यात आला, तर त्याच वेगाने पोलीस गाडी निघेल का? जर उत्तर 'होय' असेल तर पुणे पोलिसांच्या या तत्परतेचे अभिनंदनच करायला हवे.

पण जर वेगाची ही मर्यादा केवळ निवडक प्रकरणांपुरती असेल, तर ही तत्परता निश्चितच विश्वविक्रमात नोंदवावी अशी आहे. कारण सामान्य माणसाच्या दारात पोहोचेपर्यंत तिचा वेग पुन्हा का मंदावतो, हा प्रश्न अनुत्तरित राहतो! लोकांना पोलिसांकडून उपकार नकोत. न्याय्य, निष्पक्ष आणि समान वेगाची कायदा अंमलबजावणी हवी आहे. पोलीस ठाणे हे सत्तेचे दार नसून सामान्य नागरिकाच्या न्यायाचा पहिला दरवाजा असला पाहिजे. तो दरवाजा सर्वांसाठी समान वेगाने उघडला, तरच 'सर्वांसाठी कायदा समान' या वाक्याला खरा अर्थ प्राप्त होईल.

# राष्ट्र सह्याद्रीचा विदेशातही डंका साई निर्माण कडून विषेश आभार

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शिर्डी आणि परिसरामध्ये आपल्या उत्कृष्ट आणि निडर पत्रकारितेसाठी परिचित असलेल्या 'दैनिक राष्ट्र सह्याद्री' या माध्यमसमूहाने आता आपल्या कर्तृत्वाचा विस्तार थेट परदेशापर्यंत पोहोचवला आहे. नुकत्याच पार पडलेल्या एका भव्य तीर्थयात्रा प्रवासाचे सविस्तर आणि वेधक कव्हरेज करत 'राष्ट्र सह्याद्री'च्या मीडिया टीमने आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. गेल्या १० दिवसांपासून, म्हणजेच २९ ऑगस्टपासून ही विशेष मीडिया टीम या संपूर्ण यात्रेसोबत सावलीसारखी सोबत होती. यात्रेची सुरुवात रेल्वे प्रवासापासून झाली, तिथून पुढे बस प्रवास, प्रवाशांची खाण-पान व्यवस्था, आरोग्याच्या सुविधा, काशी विश्वनाथ मंदिराचे दिव्य दर्शन आणि अयोध्येतील श्रीराम मंदिराचे अलौकिक दर्शन या प्रत्येक महत्त्वाच्या क्षणाचे थेट आणि सविस्तर वृत्तांकन वाचकांपर्यंत पोहोचवण्यात आले. नेपाळमध्येही वाजवला डंका या यात्रेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ देशांतर्गत मर्यादित न राहता तिने परदेशात, म्हणजेच शेजारील राष्ट्र नेपाळमध्येही प्रवेश केला. राष्ट्र सह्याद्रीच्या टीमने अत्यंत साहसी आणि समर्पित वृत्ती दाखवत भारत-नेपाळ बॉर्डर, नेपाळची राजधानी काठमांडू, पवित्र पशुपतिनाथ मंदिर तसेच मनकामना मंदिरासारख्या ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांचे इत्यंभूत वृत्तांकन केले. परदेशात जाऊन तिथल्या प्रत्येक घडामोडीची माहिती भारतात आपल्या वाचकांपर्यंत पोहोचवण्याची ही कामगिरी अत्यंत वाखाणण्याजोगी ठरली. साई निर्माण उद्योग समूहाकडून विशेष आभार 'राष्ट्र सह्याद्री' मीडिया टीमचे प्रमुख तथा शिर्डी कार्यालय प्रमुख अशोक दुशिंग आणि त्यांच्या संपूर्ण सहकाऱ्यांनी केलेल्या या दर्जेदार, निस्सीम आणि अथक वृत्तांकनाबद्दल 'साई निर्माण उद्योग समूहा'चे अध्यक्ष विजयराव कोते आणि त्यांच्या संपूर्ण टीमने जाहीरपणे विशेष आभार व्यक्त केले आहेत. यावेळी बोलताना विजयराव कोते म्हणाले की, ''राष्ट्र सह्याद्रीच्या मीडिया टीमने ज्या समर्पित भावनेने आणि व्यावसायिक कुशलतेने यात्रेच्या प्रत्येक टप्प्याचे चित्रीकरण व लेखन केले आहे, त्यामुळे हा प्रवास सोन्याहून पिवळा झाला. त्यांच्या या आगळ्या-वेगळ्या आणि दर्जेदार कव्हरेजमुळे आपला डंका आता थेट परदेशातही वाजत असून, त्यांनी वृत्तपत्राच्या इतिहासात एक नवा सुवर्णकाळ लिहिला आहे.'' या यशस्वी कव्हरेजमुळे संपूर्ण वर्तुळातून 'राष्ट्र सह्याद्री'च्या मीडिया टीमवर कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या या कामगिरीने वृत्तपत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

### यात्रेकरूंच्या चेहऱ्यावरील हास्य पाहून कोते यांच्या डोळ्यात आनंदाश्रू

भक्ती, सेवा आणि समाधानाचा त्रिवेणी संगम म्हणजे साईनिर्माण ग्रुपची १२ ज्योतिर्लिंग संकल्प पूर्ती तीर्थयात्रा. साईनिर्माण ग्रुप, साईसिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट आणि शिर्डी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली पशुपतिनाथ-काशी-अयोध्या ही ऐतिहासिक यात्रा प्रचंड यशस्वी झाली असून, या यात्रेत सहभागी झालेल्या यात्रेकरूंच्या चेहऱ्यावरील हास्य आणि समाधान पाहून आयोजक श्री साई निर्माण उद्योग समूहाचे अध्यक्ष विजयराव कोते पाटील यांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.



# म्हाळसा खंडोबा बानाई मंदिरात ओंकारेश्वर शिवलिंगासह घृष्णेश्वर नंदीची स्थापना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** भगवान शंकराचा अवतार असलेल्या खंडोबा देवाची सासुरवाडी नेवासा बुद्रुक येथील म्हाळसा खंडोबा बानाई पुरातन मंदिरामध्ये चौथ्या श्रावणी सोमवारचे औचित्य साधून ओंकारेश्वर शिवलिंगासह घृष्णेश्वर नंदीची स्थापना करण्यात आली.यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

खंडोबा देवाची जेथे जेथे तीर्थस्थाने आहेत त्या त्या ठिकाणी महादेवाचे शिवलिंग पहावयास मिळते त्यानुसार नेवासा बुद्रुक येथील म्हाळसा खंडोबा बाणाई पुरातन मंदिरामध्ये देखील शिवलिंग व नंदी असावा अशी भावना व इच्छा पुरातन मंदिर जीर्णोद्धार समितीचे प्रमुख संभाजी राव ठाणगे यांनी व्यक्त केली होती त्यानुसार चौथ्या श्रावणी सोमवारचे औचित्य साधून गुजरात येथील ओंकारेश्वर येथून महादेवाचे शिवलिंग व घृष्णेश्वर येथून नंदीची आकर्षक मूर्ती स्वखर्चाने आणली.

यावेळी पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई मंदिरात झालेल्या शिवलिंग व नंदीच्या मूर्तीच्या स्थापना कार्यक्रम प्रसंगी शिवलिंगासह नंदीच्या मूर्तीस ओम शांती केंद्राच्या राजयोगिनी वंदना दिदी,राजेश भाई,हभप विश्वनाथ महाराज मंडलिक, सुमनताई मंडलिक, प्रयागाबाई ठाणगे, शांताबाई काशीद, मंदिर जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष संभाजीराव ठाणगे, संगीता ठाणगे, राजेंद्र काशीद, आशाताई काशीद,पुरातन देवस्थान




प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण यांच्या हस्ते जलाभिषेक घालण्यात आला.

यावेळी खरवंडी येथील जय मल्हार जागरण गोंधळ पार्टीच्या वतीने नामदेव खरात गोमळवाडीकर,अशोक नगरे,ललित शिंदे,आप्पासाहेब भोगे,वैभव खंडागळे, अनिल बर्डे यांनी म्हाळसा खंडोबा व भगवान शंकराची गाणी सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी बेलापूर येथील खंडोबा म्हाळसा चरित्र लेखक मार्तंड वाळके,सेवेकरी प्रकाशराव उंडे सर,बालूभाऊ फसले,शंकर महाजन, उद्योजक नितीन मारकळी,दादा मरगळ,भजन जाधव, सेवक शांताराम बोर्डे,सौ.सायली ठाणगे,अश्विनी ठाणगे यांच्यासह महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात येऊन भक्तांसाठी साबुदाणा खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# गणेशखिंड संशोधन केंद्राचे शेतकऱ्यांसाठीचे कार्य कौतुकास्पद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी, :** शेतकऱ्यांना दर्जेदार रोपे, आधुनिक तंत्रज्ञान आणि संशोधनाधारित मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात विभागीय कृषी संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. मर्यादित मनुष्यबळ असतानाही केंद्रातील शास्त्रज्ञ व कर्मचाऱ्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे सहाय्यक महासंचालक (फळे व लागवडीची पिके) डॉ. विश्व बी. पटेल यांनी काढले. डॉ. पटेल यांनी गणेशखिंड येथील विभागीय कृषी संशोधन केंद्रास भेट देऊन विविध संशोधन व विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, पुष्प संचालनालयाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद, राष्ट्रीय कांदा व लसूण संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राम दत्ता, संचालक संशोधन डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, डॉ. सुभाष भालेकर व सहयोगी संशोधन संचालक डॉ. दत्तात्रय लाड उपस्थित होते. डॉ. पटेल यांनी प्राचीन पेशवेकालीन आंबा, आधुनिक रोपवाटिका, जैवविविधता वारसा केंद्र व कृषी प्रदर्शनास भेट दिली. शेतकऱ्यांना गुणवत्तायुक्त रोपे पुरविणाऱ्या द्वितारांकित रोपवाटिकेच्या कार्याचे त्यांनी विशेष कौतुक केले. सुमारे १५३ वर्षांचा ऐतिहासिक वारसा असलेल्या या केंद्रातील संशोधन व विकासकार्य प्रशंसनीय असून, केंद्राच्या पुढील वाटचालीस डॉ. पटेल यांनी शुभेच्छा दिल्या.




# जय हनुमान मित्र मंडळाची दहीहंडी शिवएकता मित्र मंडळाने फोडली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथील मारुती चौकातील सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर असलेल्या जय हनुमान मित्र मंडळाच्या मानाच्या दहीहंडीचे पूजन संत महंत व मान्यवरांच्या हस्ते करण्यात येऊन नेवासा शहरातील दहीहंडी उत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. शिवएकता मित्र मंडळाने मानाची पहिली दहीहंडी फोडली.

मारुती चौकात झालेल्या दहीहंडी शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त व मार्गदर्शक वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री, ऋषिनाथ महाराज, हभप अंकुश महाराज जगताप, श्री चक्रधर स्वामी महानुभाव आश्रमाचे उत्तराधिकारी धनंजय मुनी महाराज, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, सहायक पोलीस निरीक्षक अमोल पवार,उपनिरीक्षक विकास पाटील, ॲड. संजय सुखदान, नगरसेवक महेश लोखंडे, राजू काळे, जालिंदर गवळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बाल भगवान श्रीकृष्ण, बजरंग बली यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.जनसेवक स्वर्गीय राजेंद्र मापारी व स्व. सीमाताई मापारी यांचा शिक्षक दिनी स्मृती दिन असल्याने त्यांच्या स्मृतीस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रम संयोजक जय हनुमान मित्र मंडळाचे अध्यक्ष व नगरसेवक स्वप्नील मापारी यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. उपस्थित मान्यवरांचा सन्मान जय हनुमान मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आला.

यावेळी झालेल्या मानाच्या दहीहंडी कार्यक्रम प्रसंगी नगरसेवक संदीप सरकाळे,नगरसेवक संभाजी धोत्रे,योगेश रासने, रूपेश उपाध्ये, जयवंत मापारी, दिपक धोत्रे,मुकुंद गुरव यांच्यासह हजारो नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी अनिकेत सोनार, डॉ. निलेश लोखंडे यांचे विशेष पाठबळ लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले. नगरसेवक स्वप्नील मापारी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी जय हनुमान मित्र मंडळाचे अध्यक्ष स्वप्निल मापारी, सदस्य अजिंक्य जगताप, सोमेश मापारी, ॲड. अनिकेत मापारी, गणेश चौधरी, शिवाजी शेजुळ, समीर मापारी, शरद पंडुरे, वरद वाघ,अनुज बोरुडे, समर्थ डहाळे,वैभव माळवे,ऋषिकेश वर्मा,अजय रासने, देवेंद्र वर्मा,ज्ञानेश्वर देशमाने,अक्षय पोतदार यांनी विशेष प्रयत्न केले.मानाची असलेली दहीहंडी शिवएकता मित्र मंडळाने फोडली यावेळी जय हनुमान मित्र मंडळाच्या वतीने ट्रॉफी वितरण करण्यात आले.

# महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे लोकार्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** महिलांची सुरक्षितता अधिक मजबूत करण्याबरोबरच शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालणे आणि कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने संगमनेर शहरातील प्रमुख चौक तसेच अति संवेदनशील भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा उभारण्यात आली आहे. या सी सी टीव्ही कॅमेऱ्याचे लोकार्पण महायुतीच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि आमदार




अमोल खताळ यांच्या माध्यमातू शहरात वाढत्या लोकसंख्ये बरोबरच वाहनांची वाढती वर्दळ आणि महिला सुरक्षितता, चोरीच्या घटनांना आळा घालणे तसेच कायदा व सुव्यवस्थ राखण्यासाठी शहरातील प्रमुख चौक तसेच अतिसंवेदनशील भागांत सी सी टीव्ही कॅमेरे बसविणे गरजेचे असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या निदर्शनास आणून दिले .आमदार खताळ यांच्या मागणीची पालकमंत्री विखे पाटील यांनी दखल घेत जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ९९ लाख रुपयाचा निधी मंजूर केला आहे या निधीतून शहरात बसविलेल्या सी सी टीव्ही कॅमेऱ्याचे लोकार्पण महायुतीच्या कार्यकर्त्यांनी हस्ते करण्यात आले.

# कृषी अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, पारदर्शक चौकशीची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील कृषी अधिकाऱ्याने पदाचा गैरवापर करत शासनाच्या आलेल्या योजना, त्यावर बोगस, बनावट, कारभार करून अनेक प्रकरणात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करून याची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून कृषी अधिकार्यावर शिस्तभंग निलंबनाची कारवाई करून फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन नामदेव साळवे यांनी माहितीस्तव संबंधित विभागाला निवेदनाद्वरे मागणी केली आहे.

या संदर्भात निवेदनात म्हटले की, नेवासा कृषी अधिकारी धनंजय हिरवे यांनी कार्यकाळात सरकारी दप्तर विक्री, रद्दी,अनुदान व प्रत्यक्ष रेकॉर्डमध्ये तफावत,स्टॉक रजिस्टर, वितरण, मुख्यमंत्री योजना, कार्यालयीन कर्मचारी आढळणारी तफावत, भरती व बोगस बनावट कारभाराविषयी चौकशी करत या प्रकरणात लाखो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असून सदरचे हे प्रकरण दडपले असण्याची शक्यता व्यक्त करून लाखो रुपयांचा अपहार झालेला आहे. त्या अनुषंगाने शेतकऱ्यांसाठी शासनाकडून येणारे बी बियाणे खते औषधे वाटपाची विभागीय चौकशी करून कार्यरत असलेल्या कृषी सहाय्यक कर्मचाऱ्यांची कोण, कुठे, अधिकारी असतात त्याचीही शेतकऱ्यांना माहिती ठाऊक नसल्याने जनतेचा पगार लुटला जात असून गुप्तपणे चौकशी करून त्यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी श्री साळवे यांनी केली आहे. संबंधितावर कारवाई न झाल्यास पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

# राहुरीतील देवळाली प्रवरा नगरपरिषदेची सोनेरी भरारी

## त्रिंबकराज वाचनालय अन् पाणीपुरवठा विभागाला 'आयएसओ'चा बहुमान !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** स्थानिक पातळीवर उत्तम आणि पारदर्शक लोकसेवा देणाऱ्या राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. नगरपरिषदेच्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'श्री त्रिंबकराज मोफत वाचनालय' आणि 'पाणीपुरवठा विभाग' या दोन्ही विभागांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'आयएसओ ९००१:२०१५' (खडज ९००१:२०१५) हे गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली प्रमाणपत्र बहाल करण्यात आले आहे.

नगरपरिषदेच्या या कामगिरीमुळे देवळाली प्रवरा शहराच्या नाविन्यपूर्ण व कार्यक्षम कारभाराचे जागतिक स्तरावर कौतुक होत आहे.

पाणीपुरवठा आणि ग्रंथसेवेत आंतरराष्ट्रीय दर्जा 'आयएसओ' प्रमाणपत्र मिळणे म्हणजे नगरपरिषदेकडून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सुविधा या जागतिक निकषांवर तंतोतंत उतरल्याचे स्पष्ट सिद्ध होते. देवळाली प्रवरा नगरपरिषदेने शुद्ध, नियमित व गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठ्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे.

तसेच, सन १९५६ पासून देवळाली प्रवरातील हजारो वाचकांना ज्ञानसमृद्ध करणारे आणि १९६० मध्ये शासनमान्य मिळालेले 'अ' दर्जाचे श्री त्रिंबकराज मोफत वाचनालय हे वाचकांना आंतरराष्ट्रीय दर्जाची सेवा पुरवत असल्याचे अधोरेखित झाले आहे. या वाचनालयात स्पर्धा परीक्षा, कथा-कादंबऱ्या, शेती, कायदे, इतिहास आणि अध्यात्म अशा अथांग ग्रंथसंपदेचा लाभ हजारो अभ्यासक घेत आहेत.

**''या आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्राने आमच्या कामातील जबाबदारी आणखी वाढवली आहे. वाचनालय आणि पाणीपुरवठ्याच्या कामकाजात अधिक पारदर्शकता, शिस्तबद्धता व गुणवत्ता टिकवून ठेवण्यास यामुळे मोठे प्रोत्साहन मिळेल.''**

**` ऋषिकेश पाटील, मुख्याधिकारी (देवळाली प्रवरा नगरपरिषद)**

**''गेल्या सात ते आठ वर्षांत नगरपरिषदेच्या सर्व अधिकारी, कर्मचारी व सहकाऱ्यांनी रात्रीचा दिवस करून घेतलेल्या मेहनतीचे हे फळ आहे. हा बहुमान संपूर्ण देवळाली प्रवरवासीयांचा आहे.'' ` सत्यजित कदम, नगराध्यक्ष (देवळाली प्रवरा नगरपरिषद)**

अभ्यासिकेत विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद वाचनालयाचे ग्रंथपाल संभाजी वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या अभ्यासिकेचा रोज शेकडो विद्यार्थी लाभ घेत असून, आयएसओ मानकांमुळे या अभ्यासिकांना आणखी अद्ययावत सुविधा मिळणार आहेत. नगरपरिषदेच्या या ऐतिहासिक यशामुळे संपूर्ण राहुरी तालुक्यातून देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे अभिनंदन होत आहे.




# ममदापुरात महावितरणचे आपत्कालीन भारनियमन सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ममदापूर :** राहाता तालुक्यातील ममदापूर परिसरात महावितरणकडून आपत्कालीन भारनियमन सुरू झाल्याने ग्रामस्थांसह शेतकरी वर्गामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दुष्काळी परिस्थितीने आधीच त्रस्त असलेल्या नागरिकांच्या अडचणीत आता वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याची भर पडली आहे. वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतीपंप, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, घरगुती कामे तसेच लघुउद्योगांवर परिणाम होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. विशेषतः शेतीसाठी विजेवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसत आहे. एकीकडे पावसाची अनिश्चितता आणि दुष्काळाचे संकट, तर दुसरीकडे वीज भारनियमनामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे दुष्काळात तेरावा महिना अशी संतप्त प्रतिक्रिया ममदापूर परिसरातून व्यक्त होत आहे. महावितरणने भारनियमनाचे योग्य नियोजन करून नागरिकांना पूर्वसूचना द्यावी आणि वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## सह्याद्रीतील कपारेश्वरात दहिहंडी साजरी



**झरेकाठी** : कळसूबाई मित्र मंडळाच्या गिर्यारोहकांनी सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर असलेल्या इगतपुरी तळेगाव येथील कपारेश्वर डोंगरावर नैसर्गिक कपारीत स्वयंभू असलेल्या महादेवालयात सिमेंटच्या जंगलापासून दूर निसर्गाच्या सानिध्यातील स्वयंभू कपारेश्वरचा व श्रीकृष्णाच्या मूर्तीचा अभिषेक,पूजन, आरती करून श्रीकृष्णाचा पेहराव परिधान केलेल्या बालगोपालांच्या हस्ते दहिहंडी फोडण्यात आली.याप्रसंगी गिर्यारोहकांनी सामाजिक व राष्ट्रीय भावना जपत नेपाळ मध्ये नैसर्गिक आपत्तीत मृत्युमुखी पडलेल्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. गिर्यारोहकांनी सह्याद्रीत साजऱ्या केलेल्या दहिहंडी उत्सवात कळसूबाई मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भागीरथ मराडे,इगतपुरीच्या माजी नगराध्यक्षा अलकाताई चौधरी,पल्लवी शिंदे, सुरेश चव्हाण,गोकुळ सूर्यवंशी,भगवान तोकडे,नाना टाकळकर तसेच महिला भगिनी सहभागी झाल्या होत्या.

## प्रवरेत बुधवारी शिवार फेरी; आधुनिक शेतीचा जागर

**प्रवरानगर** : बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर कमी पाण्यात, कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात मिळावी, यासाठी बुधवारी (दि. ९) सकाळी १० वाजता प्रवरा कृषी शास्त्र संस्था, लोणी येथे भव्य शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेची प्रवरा कृषी शास्त्र संस्था, पायरेन्स कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम होत आहे. 'क्लासरूम टू फील्ड' संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या कृषी तंत्रज्ञान पार्कची पाहणी शेतकऱ्यांना करता येणार आहे. मल्चिंग, हायड्रोपोनिक पद्धती, ग्रो बॅग, जैविक व सेंद्रिय शेती, मर्यादित खत व पाण्याचा वापर यांची प्रात्यक्षिके यावेळी दाखविण्यात येतील. कोबी, फुलकोबी, वांगी, भेंडी, पालेभाज्या, भोपळा, कारली, काकडी यांसह विविध फळपिके व ऊस उत्पादनाची माहिती दिली जाणार आहे. यासोबतच नर्सरी, मशरूम, मधुमक्षिकापालन, गांडूळखत, कृषी प्रक्रिया व मार्केटिंग याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. शेतकऱ्यांसाठी ही शिवार फेरी आधुनिक शेतीची दिशा देणारी ठरणार असल्याचे संस्थेचे संचालक प्रा. डॉ. उत्तमराव कदम यांनी सांगितले.

## गोदावरीकाठच्या शेतकऱ्यांच्या मोटारींच्या केबल चोरीला

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील महांकाळवाडगाव परिसरात गोदावरी नदीकाठच्या आठ ते नऊ शेतकऱ्यांच्या शेतीपंपांच्या केबलची चोरी झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. २९ ऑगस्टच्या रात्री या चोऱ्या झाल्याचे सांगण्यात आले असून, याबाबतची फिर्याद पोलिसांनी ३ सप्टेंबर रोजी उशिराने दाखल करून घेतल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. नीलेश शेडगे, प्रकाश वानखेडे, दिलीप चोरमल, नारायण चोरमल, प्रसाद निघुट, दादासाहेब आव्हाड, भीमाशंकर आव्हाड, राहुल चोरमल आदी शेतकऱ्यांच्या मोटारींच्या केबल चोरीस गेल्या आहेत. तालुक्यात शेती साहित्याच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून, मोटारी, केबल, स्टार्टर, ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या तसेच सोलर पॅनल व बॅटऱ्या चोरीला जाण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. भामाठाण, खानापूर, माळवाडगाव, महांकाळवाडगाव, सरला खैरी, निमगाव, दिघी आदी परिसरांतही अशा घटना घडल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पावसाअभावी पिकांना संरक्षित पाणी देण्याची वेळ आलेली असताना शेतीपंपांच्या केबल चोरीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. पोलिसांनी या चोऱ्यांचा तातडीने तपास करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अन्यथा उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकरी संघटना स्वतंत्र भारत पक्षाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष नीलेश शेडगे यांनी दिला.

**धर्मात्मा मल्टीस्टेट क्रेडीट को ऑप सोसा लि. शेवगाव**
**ता. शेवगाव जि.अहिल्यानगर**

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदासाठी)**

धर्मात्मा मल्टीस्टेट क्रेडीट को ऑप सोसा लि.शेवगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते कि, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२४.०९.२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. स्थळ सबलोक हाउस आखेगाव रोड, शेवगाव या कार्यालयात संस्थेचे चेअरमन श्री. विजय श्रीराम सबलोक यांच्या अध्यक्ष ते खाली खालील विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. ही विनंती।

**- सभेपुढील विषय**
१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. संस्थेचे सन २०२५ – २६ चे आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे,
३. सन २०२५-२६ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.
४. सन २०२६- २७ च्या अंदाजपत्रकातील खर्चास मंजुरी देणे.
५. सन २०२६ – २७ कालावधी करिता वैधानिक लेखापरीक्षक यांची निवड करणे,
६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे.

स्थळ शेवगाव
दि.०८.०९.२०२६

**धर्मात्मा मल्टीस्टेट क्रेडीट को ऑप सोसा लि. शेवगाव**
**ता. शेवगाव जि. अहिल्यानगर**

**टीप : १**. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरु करण्यात येईल सदर सभेस कोरम ची आवश्यकता असणार नाही. **२**. सभासदांना कोणत्याही प्रकारची माहिती वार्षिक सर्वसाधारण सभेत पाहिजे असल्यास तसेच अहवाल संबंधी काही प्रश्न अगर सूचना द्यावयाच्या असल्यास दि २०.१०.२०२६. पर्यंत कार्यालयात लेखी स्वरुपात द्याव्यात अन्यथा त्याचा विचार करणे शक्य होणार नाही.

# गणेश विसर्जन मिरवणुकीत डिजेला नो एंट्री !

## पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचा गणेश मंडळांना इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राहुरी शहरातील गणेश मंडळांना पोलीस प्रशासनाने यंदा शिस्त कायदा धाक आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा इशारा देतानाच सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमाचे काटेकोर पालन करावे आणि विशेषता डीजेच्या आवाजाची मर्यादा ओलांडून नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी राहुरी तालुक्यातील गणेश मंडळांना दिले आहे.



राजकारण राजकारणाच्या जागेवर ठेवावे मिरवणुकीत अशा प्रकारचे फोटो अथवा प्रदर्शन करू नका जे तुम्हाला भविष्यात अडचणीत आणू शकते. आमची तुमच्याशी कोणतीही दुश्मनी नाही, मात्र कायदा मोडला तर कारवाई करावीच लागेल. मला कारवाई करण्यासाठी भाग पाडू नका असा सज्जड इशारा त्यांनी गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना दिला. राहुरीत शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन हे गणेश मंडळांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, राहुरी ही पुण्यभूमी असून येथील मंडळांनी महाराष्ट्र समोर आदर्श निर्माण करावा. पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देण्यात यावे, तसेच पोलीस रेकॉर्ड लिस्टवर असणाऱ्या गुन्हेगारांना वर तडीपारीची कारवाई केली जाणार आहे. तुम्ही त्या यादीत येऊ नका पुढील विसर्जन मिरवणूक तुमचे नाव पोलिसांच्या कारवाईच्या यादीत येऊ देऊ नका असा सज्जड इशाराही त्यांनी गणेश मंडळांना दिला. गणेश उत्सवाच्या माध्यमातून सार्वजनिक उपक्रम राबविण्याचे आवाहन करताना मंडळांनी गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करावी.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक बांधिलकी जपवावी असे आवाहन केले. या प्रसंगी उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर तहसीलदार डॉ. अमित पवार मुख्याधिकारी विद्या पाटील पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांच्यासह विविध मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ईपीएस-९५च्या लढ्याला नवे नेतृत्व

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव / श्रीरामपूर** : ईपीएस-९५ पेन्शनधारकांच्या हक्कांच्या लढ्याला अहिल्यानगर जिल्ह्यात नवे नेतृत्व मिळाले आहे. ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समितीच्या अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्षपदी आण्णासाहेब नाथाजी म्हस्के पाटील, तर श्रीरामपूर तालुका कार्याध्यक्षपदी भास्करराव खंडागळे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रीय संघर्ष समितीचे राष्ट्रीय संयोजक व अध्यक्ष कमांडर अशोक राऊत यांच्या वतीने ५ सप्टेंबर रोजी नियुक्तीपत्र देण्यात आले. आण्णासाहेब म्हस्के पाटील यांच्या सामाजिक कार्याचा अनुभव, संघटन कौशल्य आणि कार्यतत्परतेचा विचार करून त्यांच्यावर जिल्ह्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. भास्करराव खंडागळे पाटील यांच्या नियुक्तीमुळे श्रीरामपूर तालुक्यातील पेन्शनधारकांना संघटित व्यासपीठ मिळणार आहे. ईपीएस-९५ पेन्शनधारकांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करणे, ज्येष्ठ पेन्शनधारकांच्या समस्या संवेदनशीलतेने मांडणे तसेच विधायक व शांततापूर्ण आंदोलनाच्या माध्यमातून संघटनेची चळवळ अधिक बळकट करण्याचे आवाहन नियुक्तीपत्रातून करण्यात आले आहे.

दोन्ही नियुक्त्यांचे पेन्शनधारकांकडून स्वागत करण्यात आले. या नव्या नेतृत्वामुळे जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणीला बळ मिळून पेन्शनधारकांच्या न्याय्य हक्कांसाठीचा लढा अधिक तीव्र होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# 'जिल्हा परिषद शाळा टिकवा; अन्यथा गोरगरिबांना शिक्षण विकत घ्यावे लागेल!'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : आजच्या स्पर्धेच्या युगात सरकारी नोकरीसाठी स्पर्धा परीक्षांना सामोरे जाणे अपरिहार्य झाले आहे. अशा परिस्थितीत केवळ इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या आकर्षणापेक्षा जिल्हा परिषद मराठी शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षणाला पालकांनी प्राधान्य द्यावे.



जिल्हा परिषद शाळा आणि एसटी बस या सर्वसामान्यांच्या मूलभूत सुविधा असून, त्या टिकल्या नाहीत तर गोरगरीबांना शिक्षणही विकत घ्यावे लागेल, असा इशारा ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र उंडे यांनी दिला. देवळाली प्रवरा येथील हनुमान मंदिर अंगणवाडी क्रमांक ८६ मध्ये एकात्मिक महिला व बालविकास सेवा योजना अंतर्गत शिक्षकदिन, राष्ट्रीय पोषण माह आणि रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात झाला. यावेळी अंगणवाडीची स्थायी समिती स्थापन करण्यात आली. उंडे म्हणाले, ''मोफत शिक्षणाची व्यवस्था ही सर्वसामान्य कुटुंबांसाठी मोठी आधारव्यवस्था आहे. ती टिकविण्यासाठी पालकांनी जिल्हा परिषद मराठी शाळांना बळ दिले पाहिजे. आज शिक्षणाच्या क्षेत्रातही मोठी स्पर्धा आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्यामध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याची क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे.''असे उंडे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक शिक्षिका प्रतिभा बोबे होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी योग्य आहार व पोषणाचे महत्त्व सांगितले.

अंगणवाडी सेविका शर्मिला रणधीर यांनी सूत्रसंचालन करून अंगणवाडीच्या विविध सेवांची माहिती दिली. राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत पोषण व संतुलित आहाराबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच तेजस्विनी कुऱ्हे यांची नवीन गरोदर माता म्हणून नोंदणी करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी यावेळी मिना शिंदे, संगिता जाधव, जान्हवी संसारे, मुस्कान शेख, सुमैय्या शेख, रईसा शेख, मार्था बोर्डे, मालती लांडे, अलका निकाळे, अर्चना पंडित, मंदाकिनी कुऱ्हे, तेजस्विनी कुऱ्हे तसेच माजी विद्यार्थी श्रिजा पाटोळे, सोफिया पठाण, अनस शेख, रुबिना शेख आदी उपस्थित होते. पालक,महिला आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंगणवाडी मदतनीस अनिता भालेकर यांनी आभार मानले.

रजि.नं.ए.एन.आर. / एस.एस.आर. / ३७९/७२ — रजि. दिनांक २८/०७/१९७२
जा.क्र.६०/२६ — दि:०१-०९-२०२६

**कोपरगाव तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित**
**मार्केट यार्ड कोपरगाव-४२३६०१, जि. अहिल्यानगर**

**वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस**

कोपरगाव विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित कोपरगाव या संस्थेची सन २०२५-२०२६ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि. १६/०९/२०२६ रोजी दुपारी १.०० वा. संस्थेचे चेअरमन श्री. सुरेश अंबादास पगारे यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती कोपरगाव, ता. कोपरगाव, जि.अ.नगर या ठिकाणी खालील विषयांचा विचारविनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी सदर सभेस हजर राहावे ही नम्र विनंती. कळावे,

**सभेपुढे येणारे विषय -**
१) मा. नियोजित अध्यक्षसाहेब यांना अध्यक्षस्थान स्विकारणे बाबत विनंती करणे
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायमकरणे
३) दि. ३१/०३/२०२६ अखेरच्या हिशोब पत्रकास मंजुरी देणे नफा वाटणीस मान्यता देणे
४) सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे
५) सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे
६) लेखापरीक्षण अहवाल वाचन करणे बाबद
७) सन २०२६-२०२७ या वर्षासाठी लेखा परीक्षकाची नेमणूक करणेबाबद
८) मा. अध्यक्षसाहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे

**- आपले नम्र -**

| श्री. सुरेश अंबादास पगारे | श्री. संजय सुधाकर चव्हाण | श्री. दिपक सिताराम गायकवाड |
|---|---|---|
| **चेअरमन** | **सचिव** | **व्हॉ. चेअरमन** |

**- विद्यमान संचालक मंडळ -**

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय किसन गुरसळ | श्री. कर्नासाहेब रामचंद्र वक्ते | श्री. दादासाहेब सखाहरी चव्हाण |
| श्री. कोंडीराम संपत वक्ते | श्री. दत्तात्रय विठ्ठलराव पगारे | श्री. भिकाजी गोकुळ चव्हाण |
| श्री. नामदेव कारभारी फटांगरे | सौ. शैला उमेश पगारे | सौ. रजनी फकिरा शिंपी |

**टीप- १)** सभेच्या वेळेस कोरम पूर्ण न झाल्यास त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून सभेच्या कामकाजास सुरुवात केली जाईल, त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही **२**) सभासदांना संस्थेच्या सन २०२५-२०२६ या काळातील कामकाजासंबंधी काही प्रश्न अथवा सूचना करावयाच्या असल्यास त्याबाबत लेखी सूचना करावयाच्या वार्षिक सभेच्या ३ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवसाखेरीज पोहोचतील अशा वेळेस पाठविणे अगर समक्ष आणून देणे. अशा प्रश्नांची उत्तरे व खुलासे मा. संचालक मंडळाकडून दिली जातील. ऐनवेळी विचारलेल्या माहितीचा विचार केला जाणार नाही **३**) वार्षिक अहवाल हिशोबाची पत्रके संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**सभेचे ठिकाण संस्थेचे कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि.अ.नगर**

# कामगार हिताचा कायदा रद्द !

## आगामी काळात तीव्र आंदोलन : अध्यक्ष तात्यासाहेब काळे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाची कार्यकारी मंडळाची व जनरल कौन्सिलची वार्षिक सर्वसाधारण सभा पुणे येथील एस एम जोशी सोशालिस्ट फाउंडेशन पत्रकार भवन शेजारी नवी पेठ,पुणे, येथे प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांच्या अध्यक्षतेखाली काल सोमवार दि. ७ सप्टेंबर रोजी दुपारी ठीक एक वाजता संपन्न झाली. काळे म्हणाले, सरकारने कामगार हिताचा कायदा कोणालाही विश्वासात न घेता रद्द केला, आता आगामी काळात तीव्र आंदोलन सरकार विरोधात हाती घेणार असलेचे प्रतिपादन अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांनी केले. ते राज्य कामगार प्रतिनिधी संघटनेच्या वार्षिक सभेत बोलत होते. सरचिटणीस राऊ शंकर पाटील यांनी संस्थेच्या कामकाजाचे सभेचे विषयाचे वाचन केले. दिनांक १८जून २०२५ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या व जनरल कौन्सिलच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसेडींग वाचून दाखवले. त्यास सभेने टाळ्याच्या गजरात मंजुरी देण्यात आली. एक जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ अखेरचा जमा खर्च सरचिटणीस राऊ शंकर पाटील यांनी वाचून दाखवला,त्यास सभेने एकमताने मंजुरी देण्यात आली. उपस्थितामध्ये कार्याध्यक्ष राजेंद्र चव्हाण सांगली (कोषाध्यक्ष ),प्रदिप बनगे (कोल्हापूर ),उपाध्यक्ष डी. एम. निमसे, (अहील्यानगर, मुळा कारखाना), युवराज रनवरे (इंदापूर ),प्रदीप शिंदे (सांगली) नितीन बेनकर, अशोक बिराजदार (सोलापूर),सचिव राजेंद्र तावरे,(माळेगांव) सयाजी कदम (सातारा) योगेश हंबीर (पुणे), संजय मोरबाळे (कोल्हापूर ),संजय पाटील (कराड ),अशोकराव पवार (मुळा कारखाना, युनियन अध्यक्ष) यावेळी उपस्थित होते. त्यानंतर कामगाराच्या प्रश्नाबाबत चर्चा करत सर्व पदाधिकारी यांची मते जाणून घेतली. यावेळी सर्व कामगारांनी तीव्र भावना व्यक्त केल्या त्यामध्ये केशव दिवेकर, (भिमा पाटस कारखाना), अविनाश पाटील (कुबींकासारी कारखाना), वसंतराव जगताप (छत्रपती कारखाना), दिलीप मोरे ( वसंत दादा कारखाना) गोरख फुलारी (अनुराज कारखाना), रणसिंग आटोळे (माळेगाव कारखाना), यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आभार कोषाध्यक्ष प्रदीप बनगे कोल्हापूर यांनी मानले.

रजि.नं.ए.एन.आर./आर.एस.आर. ३७५/७२ — रजि. दिनांक २८/०७/१९७२
जा.क्र.७०/२६ — दि: ०५-०९-२०२६

**राहुरी तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित**
**मु.पो. राहुरी, ता. राहुरी, जि.अहिल्यानगर**

**वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस**
**(सन २०२५-२०२६ फक्त सभासदांसाठी)**

राहुरी तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित राहुरी या संस्थेची २०२६-२०२७ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २०/०९/२०२६ रोजी दुपारी १.०० वा. संस्थेचे चेअरमन श्री. पन्हाळे रमेश भीमराज यांचे अध्यक्षतेखाली संस्थेचे कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती, राहुरी, ता. राहुरी, जि.अ.नगर या ठिकाणी खालील विषयांचा विचारविनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी सदर सभेस हजर राहावे ही नम्र विनंती. कळावे,

**सभेपुढे येणारे विषय –**
१) मा. नियोजित अध्यक्षसाहेब यांना अध्यक्षस्थान स्विकारणे बाबत विनंती करणे
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायमकरणे
३) दि.३१/०३/२०२६ अखेरच्या हिशोब पत्रकास मंजुरी देणे नफा वाटणीस मान्यता देणे
४) सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे
५) सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी-जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे
६) लेखापरीक्षण अहवाल वाचन करणे बाबद
७) सन २०२६-२०२७ या वर्षासाठी लेखा परीक्षकाची नेमणूक करणेबाबद
८) जिल्हा बँकेने मुदत ठेव, सेव्हींग वरील निबंध कमी करण्याबाबत
९) मा. अध्यक्ष साहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे
१०) नविन इमारत बांधकाम करणेबाबत

**- आपले नम्र -**

| श्री. रमेश भीमराज पन्हाळे | श्री. संजय सुधाकर चव्हाण | श्री. डोळसे तात्यासाहेब बाबुराव |
|---|---|---|
| **चेअरमन** | **सचिव** | **व्हॉ. चेअरमन** |

**- विद्यमान संचालक मंडळ -**

| | | |
|---|---|---|
| श्री. पठाण अजमखान बशीरखान | श्री. वाघचौरे जनार्धन अशोक | श्री. नालकर शिवाजी बाबू |
| श्री. देवरे अण्णासाहेब एकनाथ | श्री. प्रधान विलास जगन्नाथ | श्री. ससाणे गोरख एकनाथ |
| श्री. तांबोळी बानो हमीद | सौ. शिंदे पारुबाई गोपीनाथ | श्री. भाकरे शिवाजी नाना |

**टीप- १**) सभेच्या वेळेस कोरम पूर्ण न झाल्यास त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून सभेच्या कामकाजास सुरुवात केली जाईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही. **२**) सभासदांना संस्थेच्या सन २०२५-२०२६ या काळातील कामकाजासंबंधी काही प्रश्न अथवा सूचना करावयाच्या असल्यास त्याबाबत लेखी सूचना करावयाच्या वार्षिक सभेच्या ३ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवसाखेरीज पोहोचतील अशा वेळेस पाठविणे अगर समक्ष आणून देणे, अशा प्रश्नांची उत्तरे व खुलासे मा. संचालक मंडळाकडून दिली जातील. ऐनवेळी विचारलेल्या माहितीचा विचार केला जाणार नाही.**३**) वार्षिक अहवाल हिशोबाची पत्रके संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**सभेचे ठिकाण-संस्थेचे कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती, राहुरी, ता. राहुरी, जि.अ.नगर**

रबि.नं.ए.एन.आर./एस.एस.आर./३७१/७२. — रजि दिनांक : १/८/१९७२
जा.क्र.६५/२४

**श्रीरामपूर तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित**
**मार्केट यार्ड श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर**

**वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस**
**(सन २०२५-२०२६ फक्त सभासदांसाठी)**

श्रीरामपूर तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित श्रीरामपूर या संस्थेची सन २०२५-२०२६ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. १८/०९/२०२६ रोजी दुपारी १.०० वा. संस्थेचे चेअरमन श्री. सुरेश ऑकार चौधरी यांचे अध्यक्षतेखाली संस्थेचे कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अ.नगर या ठिकाणी खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी सदर सभेस हजर राहावे. हि नम्र विनंती. कळावे,

**सभेपुढे येणारे विषय.**
१) मा. नियोजित अध्यक्षसाहेब यांना अध्यक्षस्थान स्विकारणेबाबत विनंती करणे.
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वाचून कायम करणे
३) दि. ३१/०३/२०२६ अखेरच्या हिशोब भवकास मंजुरी देणे नफा वाटणीस मान्यता देणे.
४) सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५) सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
६) लेखापरीक्षण अहवाल वाचन करणेबाबत आणि संस्था कर्मचारी नियुक्ती बाबात
७) सन २०२५-२०२६ या वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे बाबत.
८) ए.डी.सी.सी. बँकेने संस्थेचे सर्व खाते बंद केले आहे त्यावर विचार विनिमय करणेबाबत
९) मा. अध्यक्षसाहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे,

**- आपले नम्र -**

| श्री. सुरेश ओंकार चौधरी | श्री. संजय सुधाकर चव्हाण | श्री. दीपक चरण चव्हाण |
|---|---|---|
| **चेअरमन** | **सचिव** | **व्हॉ. चेअरमन** |

**- विद्यमान संचालक मंडळ -**

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रेमचंद हिरालाल कुंकुलोळ | श्री. अनिल शंकरराव जाधव | श्री. प्रवीण बाबुराव करगडे |
| श्री. रवी रमेश पाटील | श्री. सागर किशोर भागवत | श्री. दिनेश बजरंग तरटे |
| श्री सुधीर अशोक वायचिंडे | सौ. सुजाता प्रमोद फरगडे | रश्मी राजेश फासाटे |

**टीप - १)** सभेच्या वेळेस कोरम पूर्ण न झाल्यास त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून सभेच्या कामकाजास सुरुवात केली आईल त्यास करमची आवश्यकता राहणार नाही. **२)** सभासदांना संस्थेच्या सन २०२३ २०२४ या काळातील कामकाजासंबंधी काही प्रश्न अथवा सूचना करावयाच्या असल्यास त्याबत लेखी सूचना करावयाच्या असल्यास वार्षिक सभेच्या ३ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवसाखेरीज पोहोचतील अशा वेळेस पाठविणे अगर समक्ष आणून देणे. अशा प्रश्नांची उत्तरे व खुलासे मा. संचालक मंडळाकडून दिली जातील. ऐनवेळी विचारलेल्या माहितीचा विचार केला जाणार नाही. **३)** वार्षिक अहवाल हिशोबाची पत्रके संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**सभेचे ठिकाण-संस्थेचे कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अ. नगर**

द • ख • ल



## अरुण काका जगताप व ट्रस्टतर्फे साहित्य,शिक्षण, अभियांत्रिकी क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव संपन्न

**अहिल्यानगर :** स्वर्गीय अरुण काका जगताप ट्रस्टच्या वतीने म.ना.पा च्या प्रमोद महाजन सभागृहात शिक्षक दिनाचे अवचित्य साधून साहित्य क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे अहिल्यानगर शाखेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल श्री ज्ञानदेव पांडुळे आणि कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राजेंद्र चोभे पाटील यांचा विशेष सन्मान चिन्ह व शाल श्रीफळ देऊन सत्कार जगताप परिवाराच्या वतीने करण्यात आला यावेळी आयुर्वेद शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष सचिन जगताप व आ. संग्राम जगताप व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन समिती प्रमुख तथा शहर सहकारी बँकेचे चेअरमन प्राध्यापक माणिकराव विधाते सर यांनी केले तर याप्रसंगी शहरातील सामाजिक क्षेत्रातील नगरसेवक श्री सुरेश बनसोड व आदी मित्रपरिवार पदाधिकारी कार्यकर्ते या ठिकाणी उपस्थित होते शेवटी सूत्रसंचालन पत्रकार विठ्ठल लांडगे यांनी केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत रेसिडेन्शिअल हायस्कूल जिल्ह्यात अव्वल!



**अहिल्यानगर :** मेहनत, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर रेसिडेन्शिअल हायस्कूलने शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात अव्वल कामगिरी करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. इयत्ता पाचवी, सातवी व आठवीतील तब्बल ७२ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून, या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त श्री. जी. डी. खानदेशे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य श्री. जाधव व्ही. व्ही. यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशामागील मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि संस्थेचे प्रोत्साहन यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी मार्गदर्शन करताना श्री. जी. डी. खानदेशे यांनी, शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा भक्कम पाया आहे, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी लहान वयापासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी करून सातत्य, मेहनत आणि अभ्यासाचे योग्य नियोजन अंगीकारावे, असे आवाहन त्यांनी केले.

## वि. ल. कुलकर्णी विद्यालयात शिक्षक दिन संपन्न



**अहिल्यानगर :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वि.ल.कुलकर्णी प्राथमिक शाळा, पूर्व प्राथमिक वर्ग आणि प्रगत माध्य.व उच्च माध्य. विद्यालयात दहीहंडी कार्यक्रम व ५ सप्टेंबर 'शिक्षक दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. दीप प्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने सुरू झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी संस्थेच्या सर्व विभागांच्या सर्व शिक्षकांचा तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गुलाबपुष्प आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या माजी मुख्याध्यापिका धिमते विजया, धरम प्रतिभा व खडके विद्या यांचा आदरयुक्त सन्मान करण्यात आला. अशा आनंदाने व उत्साहाने ओतप्रोत भरलेल्या या कार्यक्रमात संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी विजया रेखे, महेशजी रेखे, उदयकुमार भगणे, विठ्ठल धिमते, हेमंत जोशी, ॲड उमेश नगरकर मुख्याध्यापिका सभारदे, प्राचार्य सुनिल पंडीत, भाळवणकर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. बंड यांनी केले तर तांबे यांनी आभार मानले.

## बहुगुणी तुळशीला मानाचे स्थान : ॲड. धनंजय जाधव



**अहिल्यानगर :** बहुगुणी तुळशीला अध्यात्मात मानाचे स्थान आहे. याचबरोबर तुळशीमध्ये असलेल्या विविध गुणधर्मामुळे आयुर्वेदातही विशेष महत्त्व आहे. असे प्रतिपादन उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी केले. दररोज तुळशीचे पाने सकाळी खाल्ल्याने मधुमेह, रक्त विकार, वात, पित्त इतर आजार नाहीसे होतात. तुळशीच्या मोहोराला मंजिरी म्हणतात. मंजिरी पाण्यात टाकून ते पाणी पिल्यास पोटाचे विकार, उष्णतादाह कमी होतो.

## दहेश्वर विद्यालयात शिक्षक दिन साजरा



**अमरापुर :** श्री मारुतरावजी घुले पा शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव आज विद्यालयात भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी शिक्षक कु. स्तुती साळवे, अनुष्का दळे, प्रशांत भोसले, सारिका जाधव, साक्षी विखे यांनी मनोगतात व्यक्त करून शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. इंगावले सरांनी सांगितले की, शिक्षक दिन साजरा करण्याची कल्पना हा दिवस इतर दिवसांपेक्षा वेगळा आहे सर्वपल्ली राधाकृष्णन १९६२ मध्ये भारताचे राष्ट्रपती झाले तेव्हा काही विद्यार्थी व मात्रांनी त्यांचा वाढदिवस साजरा करण्याची इच्छा व्यक्त केली त्यावर त्यांनी माझा वाढदिवस वेगळा साजरा करण्यापेक्षा, माझा जन्मदिवस देशातील सर्व शिक्षकांच्या अमूल्य योगदान व कार्याचा सन्मान करण्यासाठी शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.

# विद्यार्थ्यांनी साकारल्या शाडू मातीपासून गणेशमूर्ती!

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवातून स्वच्छ, सुंदर, हरित अहिल्यानगर साकारू : आयुक्त डांगे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची असून, पर्यावरण संवर्धनासाठी यंदाचा गणेशोत्सव शाडू मातीच्या गणेशमूर्तीची स्थापना करून साजरा करण्याचा संकल्प करूया, असे आवाहन अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींमुळे जलस्रोत, विहिरी, तलाव व नद्यांचे प्रदूषण होऊन पर्यावरणाची मोठी हानी होते. त्यामुळे शाडू मातीच्या गणेशमूर्ती पर्यावरणासाठी फायदेशीर असून, त्याबाबत महापालिकेच्या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर महानगरपालिका व भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत शाळेतील तब्बल ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत गणेशाच्या विविध रूपातील सुंदर मूर्ती साकारल्या. विद्यार्थ्यांनी भक्तिभावाने स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती तयार करून आपल्या घरी त्यांची स्थापना करण्याचा संकल्प केला.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे, शिल्पकार प्रमोद कांबळे, संस्थेच्या प्रमुख कार्यवाहक छायाताई फिरोदिया, नगरसेवक मनोज कोतकर, पर्यावरणदूत सुरेश खामकर, प्राचार्य कैलास साबळे, मूर्तिकार बालाजी वल्लाल, घनकचरा विभाग प्रमुख प्रशांत रामदिन, सतीश गुगळे यांच्यासह पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य असून, त्यांच्यामध्ये पर्यावरण संवर्धनाची भावना निर्माण करण्यासाठी अशा विविध उपक्रमांचे आयोजन होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याबरोबरच पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पर्यावरणासाठी हानिकारक असून, त्याऐवजी शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा वापर मोठ्या प्रमाणात झाला पाहिजे.

पावसाळ्यानंतर तसेच गणेशोत्सवाच्या काळात जलप्रदूषण होऊ नये यासाठी प्रत्येकाने पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची स्थापना करावी. आपल्या घरापासून पर्यावरण संवर्धनाची सुरुवात केल्यास त्यातून मोठी लोकचळवळ उभी राहू शकते. स्वच्छ, सुंदर व हरित अहिल्यानगर साकारण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहनही आयुक्त डांगे यांनी केले.

## दिवाळीपूर्वी अहिल्यानगर मनपा कामगार-कर्मचाऱ्यांना ११ हजार रुपयांचे अनुदान

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेतील कामगार-कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी एक रकमी रु. ११ हजार २५० सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कामगार-कर्मचाऱ्यांना बोनस व सानुग्रह अनुदान मिळावे, या मागणीसाठी अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी महानगरपालिका आयुक्तांना संपाची नोटीस देण्यात आली होती.

या नोटीसीतील मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी युनियनच्या शिष्टमंडळासोबत बैठकीचे आयोजन केले. या बैठकीमध्ये युनियनने केलेल्या नोटीसीतील सर्व मागण्यांबाबत सविस्तर साधक-बाधक चर्चा करण्यात आली.

या चर्चेनंतर महानगरपालिकेतील पात्र कामगार-कर्मचाऱ्यांना दिवाळी सणाच्या ८ दिवस अगोदर ११ हजार २५० रुपयांची रक्कम एकरकमी अदा करण्याबाबत उभयपक्षी अंतिम निर्णय घेण्यात आला. तसेच कामगारांच्या इतर मागण्यांबाबतही बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा करण्यात आली.

यासोबतच कामगारांना देण्यात येणारा सणअग्रीम दिवाळीपूर्वी १५ दिवस अगोदर अदा करण्याबाबत देखील चर्चा करण्यात आली. कामगारांची थकित देणी देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. वसुली तसेच इतर मार्गाने पैसे उपलब्ध होतील, त्याप्रमाणे कामगारांची थकित देणी अदा केली जातील, असे बैठकीमध्ये ठरविण्यात आले.

या संयुक्त बैठकीमध्ये युनियनच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र सारसर, सरचिटणीस आनंदराव वायकर, बाबासाहेब मुदगल, कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, बलराज गायकवाड, विठ्ठल उमाप, महादेव कोतकर, बाबासाहेब राशिनकर, उपाध्यक्ष राहुल साबळे, अमोल लहारे, बाळासाहेब व्यापारी, विजय कोतकर, औंकार कराळे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त मेहेर लहारे, आस्थापना प्रमुख गणेश लयचेट्टी यांच्या उपस्थितीत कामगारांच्या मागण्यांबाबत अंतिम निर्णय घेण्यात आला.

## दहीहंडीचा जल्लोष, शिक्षकांचा सन्मान अन् रक्षाबंधनाचा उत्साह

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** केडगाव येथील सरस्वती प्राथमिक विद्यालयात गोकुळाष्टमी, शिक्षक दिन आणि रक्षाबंधन या त्रिवेणी कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. यावेळी गोकुळाष्टमीनिमित्त विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडून गोपाळकाला साजरा केला. राधा व श्रीकृष्णाच्या वेशभूषेत सजलेल्या बालकांनी उपस्थितांचे मन मोहून घेतले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गवळणी व कृष्णजन्माच्या गीतांनी कार्यक्रमाला भक्तिमय रंगत आणली. दहीहंडी फुटताच हाथी घोडा पालखी... जय कन्हैया लाल की...या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर दणाणून गेला. लहानग्या गोविंदांच्या उत्साहात संपूर्ण विद्यार्थीवर्ग सहभागी झाला. गोकुळाष्टमीनिमित्त शाळेच्या अंगणात आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या, तसेच फुलांची सुंदर सजावट करण्यात आली होती.

यावेळी शिक्षक दिनानिमित्त विद्यालयातील सर्व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. रक्षाबंधनानिमित्तही विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला. डॉ. श्री. शिवाजीराव देसाई यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी श्री. सोमनाथजी झाडे, नगरसेवक मनोज कोतकर, उद्योजक जालिंदर कोतकर, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य संभाजी पवार, शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर, तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.

मुख्याध्यापक संदीप भोर प्रास्ताविकात म्हणाले की, दहीहंडीचा उत्सव साजरा करण्यामागे विद्यार्थ्यांमध्ये एकीची व सहकार्याची भावना निर्माण व्हावी, हा प्रमुख उद्देश आहे. विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नेहमीच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या माध्यमातून भारतीय संस्कृती व परंपरा जपण्याचे कार्य विद्यालय सातत्याने करत आहे.

## मुळा लाभक्षेत्रातील चारीवर प्रतिबंधात्मक व जमावबंदी आदेश लागू

**ढोरजळगांव :** मुळा प्रकल्पाच्या मुळा उजवा कालव्याद्वारे राहूरी, नेवासा, शेवगांव व पाथर्डी या चार तालुक्यातील लाभक्षेत्रामध्ये सिंचनाकरिता पाणी पुरवठा करण्यात येत असुन त्या अनुषंगाने, 'मुळा उजवा कालव्याचे खरीप आवर्तन २०२६-२७' दि २१ ऑगस्ट पासून सुरु करण्यात आले असून सदर आवर्तन ४५ दिवस सुरु राहणार असुन सद्यस्थितीत अल-निनोमुळे राज्यात निर्माण होणाऱ्या दुष्काळसदृष्य परिस्थितीमुळे सिंचन आवर्तन सुरु झाल्यानंतर कालव्यातून अनधिकृत पाणी उपसा करणेसाठी पाईप, डेंगळे, इत्यादीचा वापर करुन, त्याचप्रमाणे कालवा / वितरिका / लघुवितरिका चा-या फोडून पाणी चोरीचे प्रकार घटना घडत असून अंतिम टेलच्या भागातील लाभक्षेत्रात पुरेश्या दाबाने पाणी पोहचत नाही. परिणामी नेवासा, शेवगांव व पाथर्डी तालुक्यातील मुळा उजवा कालवा/पाथर्डी शाखा कालव्यावर अनधिकृत असलेले पाईप डेंगळे त्वरित काढण्याची कार्यवाही मुळा पाटबंधारे विभागाकडुन सुरु करण्यात आली आहे.

## जेऊर 'दुरक्षेत्र' कागदावर... गुन्हेगार रस्त्यावर!

### ना इमारत..ना कर्मचारी.. ना सुविधा... सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील सर्वात मोठ्या गावांपैकी एक असलेल्या जेऊर येथे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे एकमेव पोलीस दूरक्षेत्र कागदोपत्री अस्तित्वात असले तरी प्रत्यक्षात त्याला ना स्वतंत्र इमारत आहे, ना कायमस्वरूपी पोलीस कर्मचारी, ना आवश्यक सुविधा. त्यामुळे 'दूरक्षेत्र नावालाच' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जेऊर परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

तालुक्यातील सुमारे ११० गावांची कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी नगर तालुका, एमआयडीसी आणि भिंगार कॅम्प या तीन पोलीस ठाण्यांवर आहे. त्यापैकी सुमारे ६९ गावे नगर तालुका पोलीस ठाण्याच्या, ३१ गावे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या, तर १० गावांचा समावेश भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत जेऊर हे एकमेव दूरक्षेत्र असतानाही त्याचे अस्तित्व प्रत्यक्षात जाणवत नसल्याची स्थिती आहे.

जेऊर परिसरातून छत्रपती संभाजीनगर महामार्गासह अनेक अंतर्गत रस्ते जातात. यापूर्वी या मार्गांवर रस्ता लुटीच्या घटना घडल्या आहेत. गावाची संवेदनशील पार्श्वभूमी पाहता दोन गटांतील हाणामाऱ्या, सामाजिक तेढ, यात्रोत्सवादरम्यान दगडफेकीची घटना, गोवंश तस्करीविरोधातील कारवाया तसेच रोडरोमिओंचा उपद्रव यामुळे येथे कायमस्वरूपी कायमस्वरूपी पोलिसांची नियुक्ती करण्याची मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे तत्कालीन सहा. पोलीस निरीक्षक माणिक चौधरी आणि पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे यांच्या कार्यकाळात जेऊर परिसरात पोलिसांची नियमित गस्त, गावोगावी बैठका, शाळा-महाविद्यालयांना भेटी तसेच सामाजिक सलोखा राखण्यासाठी प्रयत्न करण्यात आले होते. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तींवर पोलिसांचा वचक निर्माण झाला होता अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याचा पदभार सहा. पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी १३ जून रोजी स्वीकारल्यानंतर अडीच महिन्यांहून अधिक कालावधी उलटला आहे. तरीही जेऊर परिसरात अधिकाऱ्यांची भेट अथवा व्यापक पोलीस उपाययोजनांची ठोस हालचाल दिसून आली नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे रोडरोमिओंचा उपद्रव आणि किरकोळ वादांपासून गंभीर गुन्ह्यांपर्यंतच्या घटनांबाबत नागरिकांमधून चिंता व्यक्त होत आहे. जेऊर पोलीस दूरक्षेत्रासाठी ग्रामस्थांच्या पुढाकारातून तात्पुरत्या स्वरूपात जागा उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविण्यात आली आहे.

## पावसासाठी हातगावच्या हत्तेश्वर मंदिरात महिलांचे साकडे!



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** चालू हंगामात पावसाळ्याचे ३ महिने उलटून गेले असूनसुद्धा अजूनही बऱ्यापैकी पाऊस न झाल्याने खरीप पिकाबरोबरच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा बनत चालला असल्याने मेघराजाने एवढेही सत्व पाहू नये हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन श्रद्धेपोटी हातगावातील काही ठराविक महिलांनी एकत्र येत इतरही असंख्य महिलांना एकत्र करून गावचे श्रद्धास्थान समजल्या जाणाऱ्या श्री स्वयंभू जुने हत्तेश्वर मंदिरात असणाऱ्या नंदी महादेव मूर्तीला डोक्यावर पाणी आणून मूर्तीला पाण्यात बुडवले असून पाऊस पडू दे अशा प्रकारचे साकडे घातले आहे.

असा हा प्रयोग बऱ्याच वेळा ज्या - ज्या वेळी मेघराजाने पावसाळ्याच्या हंगामात वर पहायला लावले त्या - त्या वेळी करण्यात आला आहे. या प्रयोगाला कधी - कधी निसर्गाची योगा योगाने साथही मिळालेली असल्यामुळे श्रद्धा ठेऊन यशस्वी होत असलेल्या प्रयोगाला साथ देण्यासाठी असंख्य महिला पुढे येताना दिसून येत आहे.

# 'सावित्रीच्या लेकी' ठरल्या यशाच्या मानकरी!

### दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थिनींचा गुलाबी फेटा बांधून गौरव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सावित्रीबाई फुले यांनी प्रतिकूल परिस्थितीत स्त्री शिक्षणाची ज्योत तेवत ठेवत समाजासमोर आदर्श निर्माण केला. त्याच विचारांचा वारसा पुढे नेत मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सावेडी येथे 'मी सावित्रीची लेक पुरस्कार २०२६' हा प्रेरणादायी सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थिनींचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

स्त्री जन्माचे स्वागत व्हावे, मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांनी उच्च शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभे राहावे, या व्यापक उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रोफेसर चौकाजवळील हॉटेल रोज गोल्ड येथे दिवंगत विठ्ठल अंबी बुलबुले यांच्या प्रेरणेतून, अध्यक्ष नरेश कोटा, उपाध्यक्ष वैभव कंदी तसेच सर्व देणगीदार आणि सदस्यांच्या परिश्रमातून हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी मंचावर उपस्थित असलेल्या मान्यवरांचा संयोजकांच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तसेच अध्यक्षस्थान भूषविलेले प्रा. बत्तीन पोट्यान्ना प्राथमिक विद्यालय व श्री मार्कंडेय विद्यालयाचे चेअरमन भीमराज नारायण कोडम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थिनींना प्रेरणादायी संदेश दिला. ते म्हणाले, सावित्रीबाई फुले यांनी स्वतः शेण-दगडांचा मारा सहन करून स्त्री शिक्षणाचा जो पाया रचला, त्याच भक्कम पायावर आजच्या या सर्व यशस्विनी लेकी अभिमानाने उभ्या आहेत. सावित्रीबाई फुले यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार केवळ तुमच्या यशाचा नाही, तर स्त्रीशक्तीचा सन्मान आहे.



मुलींच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देणे आणि शिक्षणाचे महत्त्व समाजातील तळागाळापर्यंत पोहोचविणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. तुम्ही खऱ्या अर्थाने सावित्रीच्या लेकी आहात. भविष्यात कोणतीही अडचण आली तरी शिक्षणाची कास सोडू नका. उच्च ध्येय गाठा आणि आपल्या समाजाचे तसेच देशाचे नाव उज्ज्वल करा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थिनींना केले. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून मुलींच्या उच्च शिक्षणाचे महत्त्व, महिला सबलीकरण, आत्मनिर्भरता आणि बदलत्या काळात मुलींनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची गरज यावर विशेष भर दिला. मुलींना केवळ शिक्षण देणे पुरेसे नसून त्यांना आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि स्वावलंबनाची जाणीव करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अजय म्याना यांनी फोनवरून संपर्क साधून सर्व गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## दखल

### परराज्य शिष्यवृत्तीसाठी अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावेत

**पुणे :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असलेल्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परराज्यातील मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतल्यास परराज्य शिष्यवृत्ती देण्यात येते.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी विद्यार्थी ज्या जिल्ह्याचा रहिवासी आहे, त्या जिल्ह्यातील सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. परराज्यात शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीतील पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये, यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचे आवाहन विशाल लोंढे, सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी केले आहे.

### विशेष मुलांच्या प्रेमाची पोलिसांना राखी




**शिरूर :** कर्तव्य बजावताना पोलिसांवर येणारा मानसिक ताण कमी व्हावा, तसेच त्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेतली जावी, या उद्देशाने आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या वतीने शिरूर पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी 'स्ट्रेस मॅनेजमेंट' मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले.

डॉ. सोनाली हार्दे व डॉ. मनीषा चोरे यांनी ताणाची लक्षणे, त्याचे मानसिक व शारीरिक परिणाम तसेच दैनंदिन जीवनात ताणाचे प्रभावी व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले.रक्षाबंधनानिमित्त आकांक्षा स्पेशल चाईल्ड स्कूलमधील विशेष मुलांनी स्वतः तयार केलेल्या राख्या शिरूर पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनगटावर बांधल्या. प्रेम, विश्वास आणि माणुसकीचा संदेश देणारा हा भावनिक क्षण उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेला.यानंतर विशेष मुलांनी दहीहंडी फोडून आनंदोत्सव साजरा केला. शिक्षक दिनानिमित्त विशेष मुलांच्या शिक्षण व विकासासाठी योगदान देणाऱ्या मुख्याध्यापिका आरती बोऱ्हाडे, विशेष शिक्षक कुणाल बिडगर, दत्तात्रेय दुबे तसेच मदतनीसांचा सन्मान करण्यात आला.आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या संस्थापिका ॲड. रानी चोरे यांच्या पुढाकारातून झालेला हा उपक्रम पोलिसांच्या मानसिक आरोग्याची जाणीव आणि विशेष मुलांच्या प्रेमाची ऊब समाजापर्यंत पोहोचविणारा ठरला.

### खेळामुळे व्यक्तिमत्त्व विकास : चैतन्य महाराज लोंढे



**आळंदी :** खेळामुळे शरीर सुदृढ, मन प्रसन्न राहून व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. खेळातून शिस्त, संयम, आत्मविश्वास आणि जिद्द निर्माण होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत क्रीडेलाही प्राधान्य देऊन नियमित खेळावे, असे प्रतिपादन आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे यांनी केले.

ऑल महाराष्ट्र वुशू असोसिएशनच्या वतीने आळंदीत २३ वी सब-ज्युनिअर व ज्युनिअर वुशू अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. राज्यभरातील युवा खेळाडूंना या स्पर्धेत आपले क्रीडा कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली असून, विविध वयोगटांतील खेळाडूंनी उत्साहाने सहभाग घेतला.यावेळी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष तथा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दूरध्वनीद्वारे स्पर्धेला शुभेच्छा दिल्या. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करत युवकांनी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम होऊन क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करावी, असे आवाहन केले. स्पर्धेच्या आयोजनासाठी अध्यक्ष संदीप खर्डेकर, महासचिव एल. एस. कटके, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, राजन परदेशी, भाजप आध्यात्मिक आघाडीचे संजय महाराज घुंडरे, अशोक कांबळे, कालिदास तापकीर, भागवत आवटे आदी उपस्थित होते. आळंदीच्या आध्यात्मिक परंपरेचा आणि क्रीडा क्षेत्राचा संगम साधत सहभागी खेळाडूंना संत ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती व प्रसाद भेट देण्यात येणार आहे.

### कानबाई माता उत्सवाला शिरूरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद



**शिरूर :** खान्देशवासीयांचे आराध्य दैवत कानबाई माता उत्सवाचा पहिला वर्षपूर्ती सोहळा रामलिंग येथे भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. तीन दिवसांच्या या उत्सवाला शिरूर पंचक्रोशीतील खान्देशी समाजबांधवांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे पाच हजार भाविकांनी देवीचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. उत्सवाच्या प्रारंभी सप्तपूजनाचा धार्मिक विधी झाला. मुख्य दिवशी शिवरक्षा कॉलनी येथून कानबाई मातेची आरती व भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर आणि भक्तिमय जयघोषात मिरवणूक रामलिंग येथील सभामंडपात पोहोचली. तेथे विधिवत पूजा करून देवीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.उत्सवात धार्मिक कार्यक्रमांसोबत खान्देशी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. नाशिक येथील दोस्ती बँड, शेंदुर्णी तसेच खान्देशी ढोलकी बँडच्या सादरीकरणाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अंतिम दिवशी रामलिंग गावातून कानबाई मातेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. शिक्रापूर, कारेगाव, रांजणगाव आणि शिरूर शहरातील खान्देशी समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले.

### इंद्रायणी घाटावर स्वच्छता मोहीम

**आळंदी :** एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आळंदी नगरपरिषदेच्या वतीने सोमवारी सकाळी इंद्रायणी नदी घाट परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. भाविकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरणात दर्शन व स्नान करता यावे, या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. मोहिमेदरम्यान घाट परिसरातील साचलेला कचरा, वाळू, गाळ आणि टाकाऊ वस्तू हटवून परिसर स्वच्छ करण्यात आला. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, गटनेते सचिन गिलबिले, नगरसेविका ऋतुजा घुंडरे, नगरसेविका पूजा घुंडरे, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे यांच्यासह चाकण नगरपरिषदेच्या नगरसेविका विजया तोडकर व नगरसेविका विजया जाधव सहभागी झाले.यावेळी नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी, वारकरी संस्था, स्थानिक नागरिक आणि स्वयंसेवकांनी श्रमदान केले.

# डाळिंबाला जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याचे आवाहन

## डाळिंबाला जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याचे आवाहन : कृषीमंत्री भरणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** भारतीय डाळिंबाला जागतिक बाजारपेठेत उच्च दर्जाचे, सुरक्षित आणि विश्वासार्ह उत्पादन म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी गुणवत्ता, उत्पादकता, निर्यात, प्रक्रिया आणि मूल्यवर्धनावर भर देणे आवश्यक आहे. यासाठी शेतकरी, संशोधक, उद्योजक आणि शासनाने एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

यशदा, पुणे येथे राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर आणि सोसायटी फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ रिसर्च ऑन पोमोग्रोनेट यांच्या संयुक्त विद्यमाने, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या सहकार्याने आयोजित आंतरराष्ट्रीय 'डाळिंब परिषद-२०२६'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.




महाराष्ट्रात सुमारे १.०५ लाख हेक्टर क्षेत्रावर डाळिंबाची लागवड असून १२.२४ लाख मेट्रिक टन उत्पादन होते. देशाच्या एकूण उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा सुमारे ४३ टक्के आहे. मात्र, तेल्या रोगासह विविध रोग-किडी, हवामानातील अनिश्चितता, बाजारभावातील चढ-उतार आणि निर्यातीतील अडचणी ही उत्पादकांसमोरील प्रमुख आव्हाने आहेत. डाळिंबाचे उत्पादन चांगले होत असतानाही शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न का मिळत नाही, यावर संशोधन आणि धोरणात्मक उपाययोजनांची गरज आहे. काढणीनंतरचे व्यवस्थापन, शीतगृह, साठवणूक, प्रक्रिया आणि मूल्यवर्धनाच्या सुविधा वाढवून उत्पादनापासून बाजारपेठेपर्यंतची मूल्यसाखळी मजबूत करणे आवश्यक असल्याचे भरणे यांनी सांगितले.

परिषदेत विविध देशांतील शास्त्रज्ञ तसेच महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, गुजरात आदी राज्यांतील डाळिंब उत्पादक सहभागी झाले आहेत. दोन हजारांहून अधिक प्रतिनिधींच्या उपस्थितीत वाण सुधारणा, जैवतंत्रज्ञान, हवामानस्मार्ट उत्पादन, पीक संरक्षण, प्रक्रिया व मूल्यवर्धन तंत्रज्ञानावर विचारमंथन होणार आहे.

यावेळी कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र राज्य कृषी परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव मराठे यांच्यासह शास्त्रज्ञ, अधिकारी व डाळिंब उत्पादक उपस्थित होते.

## एसटी बस अडवून चालक-वाहकाला मारहाण; ८,९६० रुपयांची जबरी चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील नावरे फाट्याजवळ मध्यरात्री एसटी बस अडवून चालक व वाहकाला मारहाण करत वाहकाच्या खिशातील ८ हजार ९६० रुपये जबरदस्तीने काढून घेण्यात आले. आरोपींनी बसची समोरील काच दगडाने फोडून बसची चावीही घेऊन पलायन केले. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात चार अनोळखी व्यक्तींविरुद्ध जबरी चोरीसह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एसटी चालक संदीप गणपत थोरवे हे ४ सप्टेंबर रोजी रात्री पुण्याहून एसटी बस क्रमांक एमएच १४ एनपी ०८३८ घेऊन शिरूरकडे येत होते. रात्री सुमारे १.४५ वाजता कानिफनाथ मंदिराजवळ नावरे फाट्याच्या परिसरात नंबर नसलेल्या काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओमधून आलेल्या चौघांनी बस आडवी लावून थांबवली.

बसने त्यांच्या वाहनाला धक्का दिल्याचा आरोप करत आरोपींनी चालक थोरवे यांच्याशी वाद घातला. बसला धक्का लागला नसल्याचे सांगून त्यांनी शिरूर आगारात बसची पाहणी करण्यास सांगितले. मात्र, आरोपींनी शिवीगाळ व दमदाटी करत चालकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी एका आरोपीने वाहनातील कोयते काढण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

चालकाला सोडविण्यासाठी वाहक सतीश अण्णासाहेब बाचकर पुढे आले असता त्यांनाही मारहाण करण्यात आली. यावेळी राखाडी शर्ट व काळी पॅन्ट घातलेल्या आरोपीने वाहकाच्या खिशातील जमा झालेले ८ हजार ९६० रुपये जबरदस्तीने काढून घेतले. त्यानंतर दुसऱ्या आरोपीने दगडाने बसची समोरील काच फोडली आणि बसची चावी घेऊन सर्वजण स्कॉर्पिओमधून पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच शिरूर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. महामार्ग परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेतला जात आहे. गुन्हा क्रमांक ७८४/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक चव्हाण पुढील तपास करीत आहेत. पोलीस निरीक्षक विनोद पाटील, शिरूर पोलीस ठाणे, यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## शिक्षक दिनासह दहीहंडी उत्सव उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अवसरी बुद्रुक :** अध्यक्ष चषक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अवसरी बुद्रुक येथे शिक्षक दिन आणि दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.



यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील आदर्श शिक्षक सावकार आरगडे यांची ग्लोबल टीचर सिंगापूर उपक्रमासाठी निवड झाल्याबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सागर हिंगे व सदस्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडून गाण्यांच्या तालावर नृत्य करत आनंद व्यक्त केला. उत्सवामुळे शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाची माहिती शाळेचे मुख्याध्यापक राम गुरव यांनी दिली.

## गो-१० व गोबर पॉलिसीसाठी विशेष समिती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** देशी गोवंशाचे संगोपन, संवर्धन व संरक्षण तसेच गोशाळांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाने 'गो-१०' हे दहा कलमी धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच शेणापासून बायोगॅस व सेंद्रिय खत निर्मितीला चालना देण्यासाठी 'गोबर पॉलिसी' निश्चित करण्यात येणार आहे. या दोन्ही धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तज्ज्ञांची विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. 'राजमाता गोमाता संवाद यात्रा'च्या नागपूर येथील समारोप कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'गो-१०' धोरणाची घोषणा करण्यात आली होती. देशी गोवंशाचे संवर्धन करताना पशुपालकांना स्वावलंबी करण्यावर या धोरणात भर देण्यात येणार आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या गोबरधन योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी 'गोबर पॉलिसी' निश्चित केली जाणार आहे. शेण व सेंद्रिय कचऱ्यापासून बायोगॅस आणि सेंद्रिय खत निर्मितीला यामुळे चालना मिळणार आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी माजी प्राध्यापक व सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी डॉ. नितीन मार्कंडेय यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदस्य म्हणून माजी संचालक, शिक्षण विस्तार विभाग, माफसू, नागपूर डॉ. अनिल भिकाने, सहआयुक्त, पशुसंवर्धन, पुणे डॉ. देवेंद्र जाधव, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन, लातूर डॉ. राजकुमार पडिले, पशुवैद्यकीय तज्ज्ञ व संशोधक, माफसू, नागपूर डॉ. पंकज भानुदास हसे, प्रमुख शास्त्रज्ञ, अजितदादा पवार देशी गाय व कृषी संशोधन केंद्र, पुणे डॉ. सोमनाथ माने, गोमय मूल्यवर्धित उत्पादने निर्मिती तज्ज्ञ सुनील सूर्यवंशी, नैसर्गिक शेती पूरक उत्पादने निर्मिती व प्रशिक्षण तज्ज्ञ डॉ. सनतकुमार गुप्ता आणि आयटी तज्ज्ञ मुकेश दत्तात्रयराव मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## पावसाने ओढ दिल्याने शिरदाळे परिसरात खरीप हंगाम धोक्यात

### सोयाबीनसह पिके वाळण्याच्या मार्गावर; चाऱ्याचाही प्रश्न गंभीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शिरदाळे, धामणी, लोणी, पहाडदरा, मांदळवाडी आणि वडगावपीर परिसरात गेल्या पंधरा दिवसांहून अधिक काळ पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने जवळपास शंभर टक्के पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. मात्र, त्यानंतर पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

> पुढील दोन-तीन दिवसांत दमदार पाऊस न झाल्यास पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच काही भागातील ज्वारीची पेरणी वाया जाण्याची शक्यता असून, पाऊस आणखी लांबल्यास दुबार पेरणीचे संकट निर्माण होऊ शकते.
>
> -मयूर सरडे, माजी उपसरपंच


शिरदाळे परिसरात पावसाअभावी सुकण्याच्या मार्गावर असलेले सोयाबीनचे पीक.

सध्या सोयाबीन, बटाटा, वाटाणा, मूग, उडीद यांसह खरीप पिके वाढीच्या अवस्थेत असून काही पिकांना फुलोरा व फळधारणा सुरू झाली आहे. मात्र, पाण्याअभावी पिकांवर ताण आला असून काही ठिकाणी पिके सुकण्यास सुरुवात झाली आहे. काही क्षेत्रांत जवळपास ५० टक्क्यांपर्यंत नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

शिरदाळे परिसर पूर्वी बटाटा उत्पादनासाठी प्रसिद्ध होता. मात्र, सध्या बटाटा लागवडीचे क्षेत्र १० ते १५ टक्क्यांवर आले असून शेतकऱ्यांचा सोयाबीनकडे मोठा कल आहे. पावसाच्या ओढीमुळे हे पीकही संकटात आले आहे.

पावसाअभावी जनावरांच्या चाऱ्याची परिस्थितीही गंभीर झाली आहे. रानातील चारा वाळल्याने दुभत्या जनावरांच्या दूध उत्पादनात घट होत आहे. त्यामुळे शेतीसोबत दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांवरही आर्थिक संकट ओढवले आहे.

याबाबत माऊली डेअरीचे चेअरमन अनिकेत चौधरी, भूपेंद्र तांबे, शुभम तांबे तसेच अमूल डेअरीचे चेअरमन संतोष तांबे व निवृत्ती तांबे यांनी चिंता व्यक्त केली.

### पूर्व आंबेगावात अनिश्चित भारनियमन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** पूर्व आंबेगावातील मेंगडेवाडी, जारकरवाडी, निरगुडसर, लाखनगाव, धामणी, लोणी, वडगावपीर आदी गावांमध्ये महावितरणकडून अनिश्चित स्वरूपात भारनियमन सुरू असल्याने नागरिकांसह शेतकरी त्रस्त झाले आहेत.सकाळी तसेच सायंकाळच्या वेळेत अचानक वीजपुरवठा खंडित होत असून, तो नेमका किती वेळाने सुरळीत होईल, याबाबत ग्राहकांना पूर्वसूचना दिली जात नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे घरगुती कामे, विद्यार्थ्यांचा अभ्यास तसेच शेतीची कामे प्रभावित होत आहेत.पूर्व आंबेगावातील अनेक गावांचा परिसर बिबट्या प्रवण असल्याने रात्रीच्या वेळी अचानक वीजपुरवठा खंडित झाल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

## गणेशोत्सवात सक्तीची वर्गणी घेतल्यास खंडणीचा गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**यवत :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक गणेश मंडळांनी वर्गणी गोळा करताना कोणावरही सक्ती अथवा दमदाटी करू नये, असे आवाहन यवत पोलीस प्रशासनाने केले आहे. जबरदस्तीने घेतलेली वर्गणी ही खंडणी ठरू शकते. त्यामुळे सक्तीने वर्गणी मागितल्याची तक्रार आल्यास संबंधित मंडळ व पदाधिकाऱ्यांवर थेट खंडणीचा गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांनी दिला.गणेशोत्सवाच्या तयारीला सुरुवात झाली असून विविध मंडळांकडून व्यापारी, रहिवासी, व्यावसायिक तसेच इतरांकडून वर्गणी गोळा केली जात आहे. वर्गणी ही स्वेच्छेने असावी. दमदाटी, मारहाण, शिवीगाळ करून अथवा अवाजवी रक्कम मागून वर्गणी घेतल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले. गणेश मंडळांनी धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी करणे आवश्यक असून नोंदणी नसलेल्या मंडळांनी तातडीने नोंदणी करावी. रस्त्यावर मंडप उभारताना आवश्यक परवानग्या व कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच रात्री १० नंतर ध्वनिक्षेपक सुरू ठेवू नयेत. शांतता व निवासी क्षेत्रातील ध्वनिमर्यादेसह शासन व न्यायालयाने घालून दिलेल्या सर्व अटी-शर्तींचे पालन करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक तासगावकर यांनी केले.

# रसबेरीतून दोन भावांना लाखोंचे उत्पन्न

**नवनाथ फलके । राष्ट्र सह्याद्री**

**डिंभे :** आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात पारंपरिक पिकांना पर्याय म्हणून बेरीवर्गीय पिकांची लागवड वाढत असून, आमोंडी येथील गणेश फलके व नवनाथ फलके या दोन भावांनी रसबेरी (गोल्डन बेरी) पिकातून चांगले उत्पन्न मिळवून नवा प्रयोग यशस्वी केला आहे.

सह्याद्रीच्या डोंगररांगांतील हवामान, जमिनीचा पोत आणि सेंद्रिय शेती पद्धती रसबेरी पिकासाठी पोषक ठरत असल्याचे या प्रयोगातून स्पष्ट झाले आहे. फलके बंधूंनी मागील वर्षी १४ गुंठे क्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर रसबेरीची लागवड केली. या क्षेत्रातून त्यांना सुमारे दोन लाख रुपयांचे उत्पादन मिळाले.

**पोषक वातावरणाचा फायदा :**

**जमिनीची तपासणी करून योग्य पद्धतीने लागवड, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि पोषक वातावरणाचा फायदा घेतल्यास रसबेरी हे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर पर्यायी पीक ठरू शकते, असे कृषी विभागाचे कृषी अधिकारी घोडेगाव सिद्धेश ढवळे यांनी सांगितले. पाणी व्यवस्थापन, सुधारित वाण, शेणखत, गांडूळखत आणि सेंद्रिय पद्धतीचा वापर केल्यास पाच ते सहा महिन्यांत चांगले उत्पादन घेता येते.**

गोल्डन बेरीला पोपटी, चिरबेल पोपटी आणि रसबेरी अशी विविध नावे आहेत. पिवळसर-नारंगी रंगाचे हे गोड-आंबट चवीचे फळ कागदी कवचात वाढते. त्यामध्ये जीवनसत्त्व सी, जीवनसत्त्व बी, फायबर आणि ॲंटिऑक्सिडंट्स आढळतात. लागवडीसाठी साधारण सहा ते सात रुपये प्रतिरोप खर्च येतो. बेड पद्धतीने किंवा मल्चिंग पेपरचा वापर करून सुमारे एक फुटाच्या अंतरावर लागवड केली जाते. लागवडीनंतर दोन ते तीन महिन्यांत फळधारणा सुरू होते आणि सुमारे सहा महिन्यांपर्यंत उत्पादन मिळते.

पूर्ण वाढ झाल्यानंतर फळांचा रंग पिवळसर किंवा नारंगी होतो. तोडणीनंतर दोन किंवा पाच किलोच्या पॅकिंगमध्ये माल भरला जातो. मुंबईतील वाशी बाजारपेठेत या फळाला चांगली मागणी असून, सुरुवातीच्या काळात किलोला ५०० ते ६०० रुपये दर मिळाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.


आमोंडी येथील गणेश फलके, नवनाथ फलके या दोन भावांनी घेतलेली रसबेरी पिकाची लागवड करताना गणेश फलके शेतकरी.

यावर्षीही फलके बंधूंनी रसबेरीची लागवड केली आहे. मात्र, सततच्या पावसामुळे जमिनीतील पोषक घटक कमी झाल्याने काही झाडांमध्ये फेरसची कमतरता जाणवून पाने पिवळी पडली. योग्य नियोजन, पाणी व्यवस्थापन आणि खत व्यवस्थापन केल्यास या पिकातून चांगला नफा मिळू शकतो, असे शेतकरी नवनाथ फलके यांनी सांगितले.

# कुकडी प्रकल्प एक.... श्रेयवादात अनेक...!

## डिंभे - माणिकडोह बोगद्याच्या मंजुरीनंतर लोकप्रतिनिधीमध्ये रंगली श्रेयवादाची लढाई

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** मागील आठवड्यात कुकडी प्रकल्पासाठी चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळत तब्बल ५ हजार ७०४ कोटी आणि ५० लक्ष रुपयांची मान्यता मिळाली. यात अनेक वर्षांपासून मागणी असलेल्या डिंभे - माणिकडोह बोगद्याचा प्रश्न मार्गी लागला. मात्र या निधी उपलब्धतेवरून सर्वच राजकीय पक्षाच्या वलोकप्रतिनिधींनी आपली पाठ थोपटून घेत तो मीच अशी सोशल मीडियावर राळ उडवत सत्कार घेण्याची स्पर्धा लावली आहे. प्रकल्प एक.... श्रेय अनेक अशी गत कुकडीच्या निधी उपलब्धतेवरून झाली. त्यामुळे कुकडी पालकमंत्री राधाकृष्ण विखेंची, की सभापती राम शिंदे, आमदार रोहित पवार आणि विक्रम पाचपुते यांची हा प्रश्न उभा राहिला आहे.

कर्जत-जामखेडमध्ये कुकडीचा पाणी प्रश्न सर्वच निवडणुकीत महत्वाचा मुद्दा राहिला. यावरून आमदार, खासदार यासह स्थानिक लोकप्रतिनिधी देखील ठरला जायचा. जो पाण्याचा शब्द देईल तो नेता ठरत. त्यामुळे कुकडी स्थानिक निवडणुकीत कळीचा मुद्दा ठरत असे. कुकडी अवर्तनात पुणे जिल्हा वरचढ ठरत असताना नगर-सोलापुर जिल्ह्यास दुय्यम स्थान दिले जायचे. पाणी वाटपात देखील टेलच्या लाभक्षेत्रातील गावांना दुजाभाव दिला जायचा.

वेळोवेळी तत्कालीन लोकप्रतिनिधी आपल्या परीने यास तोंड देत पाणी उपलब्ध करीत. नुकतेच राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत डिंभे-माणिकडोह बोगद्यास हिरवा कंदील देत यासाठी चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. यासाठी तब्बल ५ हजार ७०४ कोटी आणि ५० लक्ष रुपयांची निधीची तरतूद करण्यात आली. याची घोषणा होताच कुकडी लाभक्षेत्रातील सर्वच लोकप्रतिनिधी खडबडून जागे होत आपलाच पाठपुरावा कामी आला या आशयाचे पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल करीत कार्यकर्त्यांच्या हातून सत्कार सोहळे आयोजित केले.

जुने पत्र, मंत्रिमंडळातील नेत्यांना भेटलेले फोटो टॅग करीत श्रेय घेण्याची रांग लावली. त्यामुळे नेमके कोणाचे राजकीय वजन शासन दरबारी पडले हा प्रश्न उभा राहिला आहे. जलसंपदा तथा नगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी प्रश्न तडीस लावला की, आमदार रोहित पवार यांचे व्हिजन कामी आले. यासह श्रीगोंदयाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी हातभार लावला की सभापती राम शिंदे मदतीला धावले हे उमगले नाही. मात्र कर्जतला या सर्व घाई-गडबडीत राम शिंदेनी आपला सत्कार उरकून घेतला. तर दुसरीकडे पाचपुतेंनी देखील आपला सत्कार कार्यकर्त्यांकडून केला. आ. रोहित पवार यांनी देखील आपल्या सोशल मीडियावर पाठपुरावा केल्याचे फोटो आणि पत्र व्हायरल केले.

> कर्जत तालुक्यातील ११८ गावांपैकी तब्बल ५४ गावे ही कुकडी लाभक्षेत्रात समाविष्ट आहे. या कुकडी प्रकल्पामुळे कर्जत तालुक्यास खरीप, रब्बी आणि उन्हाळी असे एकूण ४ आवर्तने मिळतात. तालुक्यातील एकूण २८ हजार २८ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येते. यामुळे तालुक्यातील हा भाग सुजलाम-सुफलाम होण्यास मदत मिळते. त्यामुळे या लाभक्षेत्रातील मतदार या कर्जत-जामखेड मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधी निवडणुकीत महत्वाची भूमिका बजावतात.

# खाजगी रुग्णालयांच्या मनमानीला लगाम!

## दरपत्रक व डॉक्टरांची पात्रता दर्शनी भागात लावणे बंधनकारक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** खाजगी रुग्णालये आणि पॅथॉलॉजी लॅबकडून रुग्णांकडून अवाजवी शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारींची आरोग्य विभागाने गंभीर दखल घेतली आहे. उपचार, विविध तपासण्या आणि डॉक्टरांच्या शुल्काबाबत पारदर्शकता ठेवण्यासाठी रुग्णालये व लॅबमध्ये दरपत्रक तसेच डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व वैद्यकीय नोंदणी प्रमाणपत्र दर्शनी भागात लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.



युवक क्रांती दलाने केलेल्या तक्रारीनंतर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र सांगळे यांनी १ सप्टेंबर २०२६ रोजी तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना लेखी निर्देश दिले आहेत. आपल्या कार्यक्षेत्रातील खाजगी रुग्णालये व पॅथॉलॉजी लॅबची प्रत्यक्ष पाहणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

रुग्णालयांमध्ये उपचारांचे दर, विविध तपासण्यांचे शुल्क, डॉक्टरांची फी तसेच औषधांच्या दराबाबत पुरेशी माहिती उपलब्ध नसल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. तसेच अनावश्यक तपासण्यांचा आर्थिक भार रुग्णांवर टाकला जात असल्याचेही आरोप झाले आहेत.

कर्जत शहर व परिसरात सामान्य रुग्णांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक पिळवणूक होत आहे. प्रशासनाने तातडीने ठोस कारवाई करून रुग्णांना दिलासा द्यावा. केवळ कागदी आदेश काढून थांबू नये. प्रत्यक्ष कारवाई झाली नाही तर युवक क्रांती दलाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा युवक क्रांती दलाचे दादा राऊत यांनी दिला.

> **आरोग्य विभागाचे प्रमुख निर्देश**
>
> रुग्णांना सहज दिसेल अशा ठिकाणी उपचार व तपासण्यांचे दरपत्रक लावणे बंधनकारक.
>
> डॉक्टरांच्या शुल्काची माहिती दर्शनी भागात लावावी.
>
> डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व वैद्यकीय नोंदणी प्रमाणपत्र स्पष्टपणे प्रदर्शित करावे.
>
> वैद्यकीय अधिकाऱ्यांनी खाजगी रुग्णालये व लॅबची प्रत्यक्ष तपासणी करावी.
>
> पाहणी व केलेल्या कारवाईचा अहवाल १० सप्टेंबर २०२६ पर्यंत तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात सादर करावा.
>
> आता आदेश कागदावरच राहणार की प्रत्यक्षात रुग्णालयांच्या भिंतीवर दरपत्रक दिसणार, याकडे कर्जत तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## द•ख•ल



### पारनेरकर रहिवासी संघाची दहीहंडी संपन्न

**निघोज :** गोविंदा रे गोपाळा, यशोदेच्या तान्ह्या बाळा या जयघोषाने कामोठे परिसर दुमदुमला आणि मुंबईच्या भूमीत पारनेरकरांच्या एकजुटीचा बुलंद आवाज घुमला. पारनेरकर रहिवासी संघ (मुंबई स्थित) यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांच्या भव्य दहीहंडी उत्सवाचा आठवा सोहळा मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या रंगतदार उपस्थितीत पार पडला. या सोहळ्यास आ. काशिनाथ दाते, आ. प्रशांत ठाकूर, रवींद्र जोशी, विकास घरत, संदीप पाटील, राहुल शिंदे, प्रशांत गायकवाड, वसंत छडे, विजुभाऊ औटी, सचिन पाटील वराळ, दत्ता कुलट, नगरसेवक भाऊ भगत, मेघना गाडगे, सागर पाटील यांच्यासह सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. दहीहंडी पूजन धनराज विसपुते, शामसुंदर कुलथे, ज्योती देशमुख, पोलीस निरीक्षक कामोठे तसेच मोहन पवार, पोलीस उपनिरीक्षक कामोठे यांच्या हस्ते करण्यात आले. या भव्य सोहळ्याच्या भाऊशेठ पावडे, कुंडलिक वाफारे, कृष्णा ढोमे, दिलीप घुले, संजय आहेर, मनोज कवडे, महादेव पुंडे, धनंजय निमसे, शुभम वाफारे, जालिंदर खोसे, सबाजी जराड, गणेश गुंड, प्रशांत ठुबे, अमोल डोंगरे, अक्षय मगर, विलास लांडगे, तुषार लांडगे, डॉ. सिताराम गुंड, माऊली तांबोळी, अश्विन गायखे, बन्सी पागिरे, एकनाथ लामखडे आदी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### विकासकामांसाठी सातत्याने प्रयत्नशील : झावरे



**टाकळी ढोकेश्वर :** पद असो अथवा नसो विकासकामे करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून धोत्रे गावाशी आमच्या कुटुंबाचे अनेक वर्षांचे जिव्हाळ्याचे नाते असून गावानेही प्रत्येक अडचणीच्या काळात खंबीर साथ दिली असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मा.उपाध्यक्ष सुजित झावरे पा.यांनी केले. पारनेर तालुक्यातील धोत्रे येथे सुमारे १५ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या सभामंडपाचे लोकार्पण सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झावरे बोलत होते. यावेळी पुढे बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले की, धोत्रे गावात स्व.आमदार वसंतराव झावरे पाटील यांच्या माध्यमातून विविध विकासकामे मार्गी लागली. त्यांच्या विचारांचा आणि विकासकामांचा वारसा पुढे नेत असताना आपणही गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.जिल्हा परिषद उपाध्यक्ष असताना धोत्रे गावासाठी प्रवेशद्वार,आरोग्य उपकेंद्र, पाणी योजना,सभामंडप,रस्ते,शाळा खोल्या,दहनभूमी, बंधारे यासह अनेक विकासकामे मार्गी लावली आहेत. गावाच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत उपलब्ध माध्यमातून जास्तीत जास्त विकासकामे करण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले. धोत्रे येथील दशक्रिया विधी घाटाच्या कामासाठी निधी देण्याचे आश्वासन सुजित झावरे पा. यांनी यावेळी दिले.यावेळी विविध विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली.यावेळी अरुणराव ठाणगे,अमोल साळवे,स्वप्नील राहीन्ज,विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

### जि.प. प्राथमिक शाळेत शिक्षक दिन साजरा



**निघोज :** निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापिका, शिक्षक यांची भुमिका साकारीत सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना शिकवीत शिक्षक दिन साजरा केला. यावेळी सर्वप्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या फोटोचे पुजन करुण पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थी मुख्याध्यापक रुद्र साळवे, उपमुख्याध्यापिका स्वरांजली उनवणे, शिक्षक अंकेश कुमार, आयुष ननवरे,फातिमा इनामदार, कार्तिक आल्हाट,प्रणाली मुंजाळ, आराध्या क्षिरसागर या बालचमुंनी काम पाहिले. मुख्याध्यापक देठे सर, ज्येष्ठ शिक्षक शिंदे सर, साबळे सर, ज्येष्ठ शिक्षिका लंके मॅडम, शिक्षीका लाळगे मॅडम आदिंनी त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना मुख्याध्यापक देठे सर म्हणाले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे कार्य महान आहे. यावेळी गाव व परिसरातील अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी शिक्षक व विद्यार्थी यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# नवनवीन विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवनवीन माध्यमिक विद्यालयात भारताचे पहिले उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी दिवसभर शिक्षकांची भूमिका उत्स्फूर्तपणे पार पाडली. प्राचार्या कु. श्रावणी धुमाळ, उपप्राचार्या कु. हर्षदा काळे व पर्यवेक्षक कु. झोबा शेख यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारल्या. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश खैरे, उपप्राचार्य जयराम नांगरे, पर्यवेक्षक मच्छिंद्र पानकर आदी व्यासपीठावर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विद्यालयातील सर्व शिक्षकांचा पेन व गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. दिवसभर शाळेचे शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज विद्यार्थी-शिक्षकांनी उत्साहाने सांभाळले. विशेष म्हणजे शिक्षकांची भूमिका साकारण्यात मुलींची संख्या लक्षणीय होती. या प्रसंगी स्वरूप मरकड, ज्ञानेश्वरी जिमडे, शालिनी गुंजाळ व कु. भाग्यश्री घोडके या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. प्राचार्य डॉ. रमेश खैरे बापूसाहेब लोंढे, बाबासाहेब मोहिते व राजेंद्र मानगुडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# कर्जत तालुक्यातील शाळांच्या दुरावस्थेवर कॉकरोच जनता पार्टी आक्रमक!

## सुविधा न दिल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारीचा इशारा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील मूलभूत सुविधांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीने शिक्षण विभागाविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. कर्जत, राशीन, कानगुडवाडी, पिंपळवाडी, सोनाळवाडी, देशमुखवाडी आदी गावांतील जिल्हा परिषद शाळांची पाहणी केल्यानंतर सुरक्षित शालेय इमारती, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, संरक्षक भिंती, पिण्याचे पाणी आणि खेळाचे मैदान यांसारख्या मूलभूत सुविधांची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



शाळांच्या दुरवस्थेवर केवळ कागदोपत्री अहवाल नको, तर प्रत्यक्ष प्रशासकीय ऑडिट करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी पक्षाने केली आहे. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षकांची नियुक्ती पूर्ण करून अहवाल सादर करावा, शिक्षकांवरील शाळाबाह्य कामांचा भार कमी करावा, प्राथमिक शाळांमध्ये कला व शारीरिक शिक्षक नियुक्त करावेत, केंद्रस्तरावर क्लर्कचे पद निश्चित करून शिपाई पद भरावे आणि शालेय पोषण आहाराचे वाटप स्वतंत्र यंत्रणेमार्फत करावे, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधांशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही! असा थेट इशारा देत कॉकरोच जनता पार्टीने प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या कालावधीत मागण्यांवर ठोस कार्यवाही झाली नाही, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी करून पुढील संघर्षाची भूमिका घेतली जाईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

आता शिक्षण विभाग या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित शाळांची प्रत्यक्ष पाहणी करणार का आणि विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणार का, याकडे पालक, विद्यार्थी व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

यावेळी मनमोहनदास खुडे, सागर शेळके, महेश सटाले, कपिल उल्हारे, प्रथमेश दरवडे, गणेश लाटे, संदीप साठे, सागर गिरे, अक्षय काळे, प्रसाद दिवटे.

# कोठारी प्रतिष्ठानच्यावतीने प्रा. पारखे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड तालुका :** ज्ञानदानाची तळमळ, विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता, संस्कारक्षम शिक्षणाची कास आणि योगविद्येच्या माध्यमातून समाजाच्या आरोग्यासाठी सुरू असलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब आप्पा पारखे यांना जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन दिल्ली आणि कै. सुवालाल भगवानदास कोठारी सामाजिक प्रतिष्ठान, जामखेड यांच्या वतीने २०२६ चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार .शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जामखेड येथील प्रसिद्ध उद्योगपती कांतीलाल कोठारी होते. यावेळी उद्धवराव देशमुख, अरुण चिंतामणी, प्रांजल चिंतामणी, दशरथ चौधरी, जयश्री देशमुख, दीपक होशिंग, डॉ. प्रताप गायकवाड, दत्तात्रेय वडे, अनंता खेत्रे, रमेश अडसूळ, दत्तात्रय काळे, शहाजी वायकर, डॉ. मनोज शिंदे, डॉ. संजय भोरे, डॉ. भरत दारकुंडे, लक्ष्मण भोरे, संतराम सूळ, अशोक निमोणकर, नासीर पठाण, मिठुलाल नवलाखा, संजय वारभोग, मनोज कुलथे ,रोहिदास केकाण वैभव कटारिया, दीपक भोरे, डॉ. कासम शेख, डॉ. गोरख गायकवाड, सुरेखा देसरडा, सुनंदा लुंकड, प्राची लुंकड यांच्यासह ल. ना होशिंग विद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व नागरिक उपस्थित होते.

# शिवबा संघटना व पारनेर तालुका पत्रकार संघातर्फे रक्तदान शिबीर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** शिवबा संघटना, पारनेर तालुका पत्रकार संघ, शिवबा दुर्गसंवर्धन परिवार यांचा रक्तदान शिबीर उपक्रम स्तुत्य असून शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गेली दहा ते बारा वर्षात रक्तदान शिबीराच्या माध्यमातून अनेक रुग्णांना जिवणदान देण्याचे काम केले असल्याचे प्रतिपादन नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा माजी पंचायत समिती सदस्य डॉ. भास्करराव शिरोळे यांनी व्यक्त केले आहे. विविध सामाजिक संघटनांनी आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात ११५ युवक व ज्येष्ठ मंडळी यांनी रक्तदान केले आहे. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पुजन व पुष्पहार अर्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. रक्तदान शिबिराचे उद्घाटन डॉ. शिरोळे व जी आर एल कंट्रक्शन कंपनीचे अध्यक्ष गणेशशेठ लामखडे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी अमृता रसाळ, ठकाराम लंके, अनिल शेटे, राजू लाळगे, बबुशा वरखडे, रामदास वरखडे, राजू वराळ, उत्तमराव लामखडे, रवि रणसिंग, सोमनाथ भाकरे, बबनराव तनपुरे , दत्तात्रय लंके, शिवाजीराव वराळ, शंकरराव लामखडे, रोहिदास लामखडे, मेजर वराळ, राजूभाऊ लाळगे, रमेश वरखडे, मच्छिंद्र लाळगे, दत्ता चौधरी, निलेश वरखडे आदी तसेच विविध संस्थाचे पदाधिकारी व शिवबा संघटनेचे पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

डॉ. शिरोळे यावेळी म्हणाले शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सामाजिक कामांच्या माध्यमातून जनतेमध्ये खऱ्या अर्थाने समाजप्रबोधन करण्याचे काम केले आहे. कोरोना काळात रक्तटंचाई जाणवू लागली मात्र शिवबा संघटनेने आजपर्यंत सातशे रक्तदात्यांच्या माध्यमातून रक्तदान करीत आरोग्यासाठी सर्वाधिक योगदान दिले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष अमृता रसाळ यांनी शिवबा संघटना, पारनेर तालुका पत्रकार संघ व शिवबा दुर्गसंवर्धन समीती यांचे कौतुक केले. रक्तदान शिबीरासाठी पिंपरी चिंचवड येथील रक्तपेढीने सहकार्य केले तसेच शिवबा संघटना, पारनेर तालुका पत्रकार संघ व दुर्गसंवर्धन समीती या माध्यमातून पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांनी धन्यवाद व्यक्त करुन आभार मानले.

# बाबर यांच्या खांद्यावर निघोज-कान्हूर पठार भाजपाची धुरा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** भारतीय जनता पार्टीच्या निघोज-कान्हूर पठार मंडळाच्या मंडलाध्यक्षपदी माजी पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अहिल्यानगर येथे भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार मा. डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या हस्ते दिनेश बाबर यांना मंडलाध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या विकासाची वाटचाल, राष्ट्रीय अध्यक्ष मा. नितीनजी नबीन यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा विस्तार, केंद्रीय गृहमंत्री मा. अमितभाई शाह यांची मजबूत संघटनात्मक रणनीती आणि महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सुरू असलेला विकासाचा झंझावात, या पार्श्वभूमीवर निघोज-कान्हूर पठार मंडळात भाजपाची संघटनात्मक ताकद आणखी वाढविण्याची जबाबदारी बाबर यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

भाजपा प्रदेशाध्यक्ष मा. रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पालकमंत्री मा. ना. डॉ. राधाकृष्णजी विखे पाटील आणि भाजपा प्रदेश उपाध्यक्ष मा. डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघोज-कान्हूर पठार मंडळात पक्ष संघटनेला नवे बळ देण्याचा निर्धार दिनेशदादा बाबर यांनी व्यक्त केला आहे.



निघोज-कान्हूर पठार मंडळातील प्रत्येक बूथवर पक्षाची संघटनात्मक पकड मजबूत करणे, नव्या कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडणे, युवक व महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग वाढविणे आणि केंद्र व राज्य शासनाच्या विकासकामांचा व लोककल्याणकारी योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविणे, याला प्राधान्य देणार असल्याचे दिनेशदादा बाबर यांनी सांगितले.

पक्षाने माझ्यावर दाखविलेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष नितीनजी नबीन, केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण तसेच मा. ना. डॉ. राधाकृष्णजी विखे पाटील आणि मा. डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली निघोज-कान्हूर पठार मंडळात भाजपा संघटना अधिक मजबूत आणि आक्रमकपणे उभी करणार आहे. येणाऱ्या काळात प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा चेहरा आणि प्रत्येक बूथ हा भाजपाचा बालेकिल्ला करण्यासाठी काम करणार, असा निर्धार दिनेश बाबर यांनी व्यक्त केला.

ग्रामीण भागातील सामाजिक व विकासात्मक प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत असलेले दिनेश बाबर यांनी ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच आणि पंचायत समिती सदस्य म्हणून विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. तळागाळातील कार्यकर्त्यांशी असलेला थेट संपर्क आणि ग्रामीण जनतेशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध या त्यांच्या जमेच्या बाजू पक्ष संघटनेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

आगामी काळात निघोज-कान्हूर पठार मंडळातील प्रत्येक गावात भाजपा मजबूत करणे, संघटनेत शिस्त व गतिमानता आणणे आणि कार्यकर्त्यांची फळी अधिक सक्षम करणे, यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम केले जाणार आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री



# प्रवरा-गोदावरी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी निश्चित मिळणार

## उपलब्ध पाण्याचे काटकसरीने वापर करा : ना. विखे पाटील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : धरणे भरलेली असली तरी पाऊस लांबल्याने प्रवरा आणि गोदावरी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसमोर पाण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून आवर्तनाचे वेळापत्रक जलसंपदा विभाग तयार करणार असून, शेतकऱ्यांना निश्चितपणे पाणी मिळेल.

त्यामुळे शेतकऱ्यांनी चिंता करू नये; मात्र भविष्यातील संभाव्य धोके लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. प्रवरा आणि गोदावरी लाभक्षेत्रातील पाणी समस्या जाणून घेण्यासाठी मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांची समन्वय बैठक झाली. बैठकीत भंडारदरा, निळवंडे आणि गोदावरी धरण समूहातील पाणीसाठ्याची सद्यस्थिती तसेच शेतकऱ्यांच्या पाण्याच्या मागणीचा आढावा घेण्यात आला. भंडारदरा, निळवंडे आणि गोदावरी धरणांची परिस्थिती फारशी वेगळी नाही. गोदावरीतून अद्याप ओव्हरफ्लोचे पाणी सुरू असल्याने चार्या सुरू आहेत.

मात्र विजेच्या प्रश्नामुळे पाणी मिळण्यात अडचणी येत असल्याने पाणी आणि वीज यांचे योग्य नियोजन करण्याची गरज आहे. उपलब्ध पाण्यावरून आवर्तनाचे नियोजन करण्याच्या सूचना जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. बैठकीत नदीपात्रातून सुरू



असलेल्या बेकायदेशीर वाळू उपशाचा मुद्दाही उपस्थित झाला. जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत मंत्री विखे पाटील यांनी खडे बोल सुनावले. वाळू उपशासाठी जलसंपदा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असतानाही त्याबाबत योग्य कार्यवाही होत नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

नदीपात्रातील अवैध वाळू उपसा तातडीने रोखण्यासाठी नियमांचा आधार घेत कठोर कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. आमदार अमोल खताळ यांनी यापूर्वी मंत्री विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आवर्तनाचे नियोजन चांगल्या पद्धतीने झाल्याचे सांगितले. यंदा धरणांमध्ये पाणी असूनही शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जलसंपदा विभाग योग्य नियोजनातून या समस्येवर मात करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भोजापूर पूरचारीचा नदीजोड प्रकल्पात समावेश आणि साकूर उपसा सिंचन योजनेला मंजुरी दिल्याबद्दल त्यांनी विखे पाटील यांचे आभार मानले.

आगामी गणेशोत्सव आणि शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन आवर्तन सोडण्याची मागणीही त्यांनी केली. बैठकीस खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, आमदार अमोल खताळ, भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, शेतकरी आणि जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### भारनियमनावर स्वतंत्र बैठक

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची याच आठवड्यात स्वतंत्र बैठक घेण्यात येणार आहे. जिल्ह्यात वाढलेल्या भारनियमनाबाबत माहिती घेऊन शेतकऱ्यांना या समस्येतून दिलासा देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केले जातील, असे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

---

# पान मसाला, तंबाखू विक्रेत्यांवर शिंगणापूर पोलिसांची कारवाई

## ११ हजारांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर** : शनिशिंगणापूर पोलिसांनी प्रतिबंधित पान मसाला व सुगंधित तंबाखूची विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत ११ हजार ४२७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोघांविरुद्ध शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ५ सप्टेंबर रोजी दुपारी सुमारे ३.२० वाजता शनिशिंगणापूर गावातील कुहाट पार्किंग परिसरातील एका पान स्टॉलवर पोलिसांनी कारवाई केली. यावेळी स्टॉलवर प्रतिबंधित पान मसाला व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवलेले आढळून आले.

पोलिसांनी कारवाईदरम्यान विमल, राजश्री, राजनिवास, आरएमडी, हिरा पान मसाला, एम. सेंटेड (गोल्ड) सुगंधित तंबाखू, गोवा १००० पान मसाला, अंबरदाना तंबाखू तसेच रजनीगंधा पान मसाला असा एकूण ११ हजार ४२७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी बाळासाहेब रावसाहेब टिक्कल (वय ३८, रा. सोनई) व अभिषेक बोर्डे (रा. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल सतीश भवर यांच्या फिर्यादीवरून शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १५८/२०२६ अन्वये बीएनएसच्या कलम १२३, २२३, २७४, २७५ व ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार एस. एस. कारेगावकर करीत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप मुटकुळे यांच्या आदेशानुसार पोलीस हवालदार सतीश भवर, लिपने, नागरगोजे व बंडू भागवत यांच्या पथकाने ही कारवाई केली.

---

# श्रीरामपूरचा गणेशोत्सव होणार ध्वनी प्रदूषणमुक्त

## पोलीस प्रशासनाची करडी नजर; नियम पाळण्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचे आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : आगामी गणेशोत्सव शांततेत, शिस्तीत आणि बंधुभावाच्या वातावरणात पार पडावा, तसेच उत्सवाला ध्वनी प्रदूषणाचे गालबोट लागू नये, यासाठी श्रीरामपूर पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. उत्सव मंगल कार्यालय येथे पोलीस, महसूल, महावितरण, नगरपालिका प्रशासन आणि गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या उपस्थितीत झाली.

गणेशोत्सव मंडळांनी परवानगी घेऊनच मंडप उभारावेत, मिरवणुकीचे नियोजन करताना वाहतूक व सुरक्षेच्या नियमांचे पालन करावे, तसेच ध्वनीवर्धक यंत्रणेचा वापर शासनाने निश्चित केलेल्या मर्यादेतच करावा, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. विनापरवाना डीजे, निर्धारित ध्वनीमर्यादेचे उल्लंघन किंवा सार्वजनिक शांततेला बाधा



आणणाऱ्या प्रकारांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलीस अधीक्षकांनी दिला.

डीजेला पर्याय म्हणून पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देत उत्सवाची संस्कृती आणि परंपरा जपण्याचे आवाहन करण्यात आले. ग्रामीण भागातील गणेशोत्सव अधिक एकोप्याने साजरा करण्यासाठी 'एक गाव, एक गणपती' उपक्रम राबविण्याचेही आवाहन करण्यात आले. उत्सव काळात समाजकंटक आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर पोलिसांची विशेष नजर राहणार असून गरजेनुसार प्रतिबंधात्मक तसेच तडीपारीची कारवाई करण्यात येणार आहे.

सोशल मीडियावरील अफवा, आक्षेपार्ह पोस्ट आणि संदेशांवर सायबर सेलच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार असल्याने नागरिकांनी कोणतीही अप्रमाणित माहिती पुढे पाठवू नये, असे आवाहन करण्यात आले. यंदा कम्युनिटी पोलिसिंगच्या माध्यमातून गणेश मंडळांच्या सहकार्याने नशामुक्ती, सायबर गुन्हे, वाहतूक शिस्त आणि पोक्सो कायद्याबाबत जनजागृती केली जाणार आहे. यासाठी तयार केलेले माहितीपर पोस्टर्स मंडळांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. श्रीरामपूरचा गणेशोत्सव शांततेत, बंधुभावाने आणि ध्वनी प्रदूषणमुक्त साजरा करून आदर्श निर्माण करूया, असे आवाहन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले. बैठकीस अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, पोलीस निरीक्षक अरुण धनवडे, पोलीस निरीक्षक विशाल खैरे, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, नगराध्यक्ष करण ससाणे यांच्यासह गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

---

# शनैश्वर देवस्थानचा ब वर्ग तीर्थक्षेत्र योजनेत समावेश

## महंत रामगिरी महाराज; पहिल्या टप्प्यात तीन कोटींचा निधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** : गोदावरीच्या काठावरील शनिदेवगाव येथील पुरातन शनैश्वर देवस्थानचा ब वर्ग तीर्थक्षेत्र विकास योजनेत समावेश झाल्याने या परिसराचा सर्वांगीण विकास होणार आहे. सुसज्ज रस्ते, गोदावरीच्या जायकवाडी बॅकवॉटरवर प्रशस्त घाट आदी विकासकामांचा मास्टर प्लॅन तयार करून कामे पूर्ण झाल्यानंतर शनिदेवगाव हे धार्मिक पर्यटन तीर्थक्षेत्र म्हणून नावारूपास येईल, असे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले.




ब वर्ग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात देवस्थानचा समावेश केल्याबद्दल जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे यांचा महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. शनैश्वर देवस्थान परिसरात अनेक पुरातन हेमाडपंथी मंदिरे असून, या देवस्थानच्या विकासासाठी गलांडे यांनी यापूर्वीही निधी उपलब्ध करून दिला असल्याचे महाराजांनी सांगितले.

त्यांच्या प्रयत्नातून पहिल्या टप्प्यात तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. अविनाश पाटील गलांडे म्हणाले की, ब वर्ग योजनेतून देवस्थानसाठी सुमारे पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार असून, पहिल्या टप्प्यातील निधीस वर्क ऑर्डरही झाली आहे. देवस्थान गोदावरी अष्टशताब्दी सर्वज्ञ महामार्गाशी जोडण्यात येणार असून, कमालपूर केटीवेअरजवळ नवीन पूल होत आहे.

त्यामुळे देवस्थान जागतिक नकाशावर येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी योगेंद्रगिरी महाराज, देविदास सामसे, सिताराम भराडे, देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, सेवेकरी व भाविक उपस्थित होते.

---

# श्री सिद्धिविनायक हनुमान मंदिराचा प्राणप्रतिष्ठा आपणास सोहळा संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : येथील बेलापूर रोड लगत कालव्याच्या कडेला असलेल्या श्री सिद्धिविनायक हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठापना सोहळा संपन्न झाला. श्रीक्षेत्र देवगड येथील गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांचे उत्तर अधिकारी महंत प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थिती हा सोहळा संपन्न झाला. शहरातील विविध राजकीय सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. मंदिर जीर्णोद्धार तसेच प्राणप्रतिष्ठापन सोहळ्यासाठी श्री सिद्धिविनायक हनुमान मंदिर भक्त मंडळ तसेच सन्मित्र मित्र मंडळाने परिश्रम घेतले.





---

# घोडेगाव येथे कांदा शेतकऱ्यांनी कांदा लिलाव पाडला बंद

## कांदा दरात घसरण झाल्याचा परिणाम



घोडेगाव (ता. नेवासा) येथे कांदा दर घसरल्याने शेतकऱ्यांनी कांदा लिलाव बंद करून घोषणाबाजी करताना शेतकरी,
**छाया : सोपान भगत**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव** : नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव येथील कांदा उपवारातील कांदा दर घसरल्याने शेतकऱ्यांनी आक्रमक होत कांदा लीलाव बंद पाडत रस्ता रोको आंदोलन करण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी मध्यस्थी करून वाहतुकीसाठी ताबडतोब रस्ता मोकळा केला.

उपआवारात सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास कांदा लिलावास सुरुवात झाली सुरुवातीलाच कांदा दर कोसळल्याचा आरोप करत शेतकरी आक्रमक होत प्रचंड घोषणाबाजी करुन कांदा लिलाव बंद पाडले त्यानंतर सर्व शेतकरी एकत्रित येऊन अहिल्यानगर संभाजीनगर महामार्गावर रस्ता रोको आंदोलन सुरू केले.

> *गेल्या चार वर्षापासून तसेच यावर्षी सुरुवातीला कांदा कवडीमोल भावाने विकला गेल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नव्हता परंतु गेल्या एक महिन्यापासून कांद्याला जेमतहम भाव मिळत असतांना व्यापारी व आडतदार संगणमताने भाव पाडत आहेत.*
>
> **भगवान वाघ, शेतकरी देवगाव**

> *शेतकऱ्यांचा गैरसमज झाला असून उत्तर भारतामध्ये कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक वाढल्याने तीन ते चार रुपये कांद्याच्या दारामध्ये घसरण झाली आहे आणि त्यामुळे घोडेगाव येथे देखील तीन ते चार रुपये कांद्याचे दर घसरले आहेत.*
>
> **अशोक येळवंढे,**
> **व्यापारी असोशियन अध्यक्ष घोडेगाव**

मात्र सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांनी मध्यस्थी करून शेतकऱ्यांना रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्याची विनंती केली त्यास शेतकऱ्यांनी सहमती देऊन तुम्ही कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी व व्यापाऱ्यांशी चर्चा करून राज्यात इतरत्र सुरू असलेल्या कांदा दराप्रमाणे या ठिकाणच्या कांदा लिलावात शेतकऱ्यांना दर देण्याची मागणी केली.

त्यानंतर पोलीस व्यापारी व कमिटीचे पदाधिकारी यांच्यामध्ये चर्चा होऊन कांदा लिलाव पुन्हा सुरू करण्यात आले. मात्र त्यानंतर समाधानकारक दर मिळत असल्याने संपूर्ण कांदा लिलाव सुरळीत पार पडला आज झालेल्या कांदा लिलावात सरासरी कांद्याला साडेचार हजाराचा भाव मिळाला तर अपवादात्मक कांद्याला साडेपाच हजाराचा भाव मिळाला आज उपवारात एकूण ३५ हजार सातशे ८४ गोण्यांची आवक आली होती.

---

# १५ ऑक्टोबरचे गाळप ठरेल 'रोगापेक्षा उपचार भयंकर'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : चालू हंगामात पावसाळ्यातील फक्त एक जुलै महिना सोडता सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत पाऊस पडलेला नसल्याने उसाची समाधानकारक वाढ झालेली नाही. सर्वत्र आडसाली ऐवजी सुरू लागवड व खोडवा ऊस पीक असुन त्याचे वाढीचा कालावधी पूर्ण होऊ न दिल्यास, कारखान्यांना ऊस रिकव्हरी तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वजनात फटका बसणार असल्याने चालू २०२६/२७ गळीत हंगाम १५ ऑक्टोबर ऐवजी दिवाळीनंतरच १५ नोव्हेंबरला सुरू करण्यात यावा अशी प्रतिक्रिया पंचगंगा शुगर अँन्ड पॉवर प्रा.लि.चे चेअरमन प्रभाकर शिंदे यांनी पत्रकारांशी बातचीत करताना दिली. पंचगंगा शुगर अँन्ड पॉवर प्रा.लि.महालगांव ( वैजापूर) येथे पत्रकारांशी चालू ऊस गळीत हंगामावर औपचारिक बातचित करताना शिंदे यांनी पुढे म्हटले आहे की मागील वर्षाच्या गाळप हंगाम चा विचार केला तर सर्वसाधारणपणे २५ लाख टन इतक्या साखरेचे इथेनॉल बनवले गेले.

तसेच एकूण साखर कारखान्या पैकी पंचाहत्तर टक्के कारखान्यांनी जरी बी हेवी मोलॅसिस या उत्पादनात गेले असतील तर एकूण उत्पादनात तीन ते चार लाख टन साखरेची भर पडली असती म्हणजे मागील वर्षी ३०५ ते ३१० लाख टन साखर तयार झाली असती.चालू हंगामात वरील दोन्हीही गोष्टी म्हणजे इथेनॉल व बी हेवी मोलॅसिस बंद केल्यास उत्पादनामध्ये फार मोठी वाढ होण्याची शक्यता नाही. कारण संपूर्ण जुन कोरडा जावून फक्त जुलै या एका महिन्यातच पाऊस झाल्यामुळे व ऑगस्ट व अर्धा सप्टेंबर कोरडा गेल्यामुळे मागील वर्षी जो २५ ते३० लाख टन डायव्हर्ट झाला इतका ऊस उत्पादन कमी होईल, म्हणजे नियमित हंगाम घेतल्यास २८० लाख उत्पादन येऊ शकेल. तसेच एक महिना अगोदर १५ ऑक्टोबर ला हंगाम चालू केल्यास संपूर्ण उत्पादनावर एक ते दीड टक्का रिकव्हरी व दहा टक्के उसाची वजन कमी येईल परिणामी ३५ ते ४० लाख टन साखरेचे उत्पादन कमी होईल , एकूण पाऊस उशिरा पडल्यामुळे डायव्हर्ट झालेली २५ ते ३० लाख टन.व एक महिना हंगाम लवकर चालू केल्यामुळे येणारी ३५ते ४० लाख टन तूट. अशी एकूण ६०ते ७० लाख टन कमी होऊन २४०ते २५० लाख टन उत्पादन येऊ शकेल जे देशांतर्गत गरजेपेक्षा कमी असल्यामुळे वर्षभर साखरेचा तुटवडा भासेल, आजची परिस्थिती बघता कारखान्यांकडे दोन महिने पुरेल एवढा साठा शिल्लक आहे.

त्यामुळे कारखाने १५ नोव्हेंबर ला चालू केले तर देशांतर्गत गरजे इतके उत्पादन मिळू शकेल मागील पाच ते सहा वर्षांमध्ये आडसाली ऊस लागवडीचे प्रमाण खूप कमी झाल्यामुळे १५ऑक्टोबर रोजी उसाची उपलब्धता अतिशय कमी राहील, चालू गळीत हंगामासाठी महाराष्ट्रामध्ये ८०% ऊस हा सुरू व खोडवा यातून मिळणारा असल्याने त्याच्या वाढीसाठी योग्य तो वेळ देणे गरजेचे आहे चालू वर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्याने ऊस लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल नाही तरी पूर्व हंगामी व सुरू उसाच्या लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी व ऊस तोड झालेल्या उसाचे खोडवे राखण्यासाठी एकूण ऊस क्षेत्राच्या कमीत कमी ४०% इतक्या क्षेत्रावर साखर कारखाने मार्फत ठिबक सिंचन करणे अत्यंत गरजेचे आहे जेणेकरून उपलब्ध पाण्यापासून काही क्षेत्र नवीन सुरू उसाची लागवड होईल व काही क्षेत्र तोडणी झालेल्या उसाचे पुढील २०२७- २८ या वर्षासाठी उसाची उपलब्धता वाढेल.